DAILY THANEVAIBHAV RNI REGD NO. 27878/ 75, POSTAL NO. THC/186/2018-2021

thanevaibhav | Thane Vaibhav | Thane Vaibhav | thanevaibhav

कल्याण-डोंबिवली, नवी मुंबई, मीरा-भाईंदर, अंबरनाथ-बदलापूर, भिवंडी, उल्हासनगर, मुरबाड, शहापूर.

ठाणेवैभव
आपले हक्काचे व्यासपीठ
आपल्या प्रभागातील समस्या आणि चांगल्या घडणाऱ्या घटनांची माहिती आम्हाला पाठवा
9892316320

स्थापना : २५ ऑगस्ट १९७५

www.thanevaibhav.in

# ठाणेवैभव

ठाणे जिल्ह्याचे सर्वाधिक खपाचे परिपूर्ण दैनिक | इष्ट ते छापणार | संस्थापक : नरेन्द्र बल्लाळ

ठाणेवैभव
A newspaper celebrating 50 golden years of constructive journalism
50 सुवर्णमहोत्सव

भारतीय सौर दिनांक कार्तिक १२ शके १९४५ | वर्ष ५१ | अंक ६७ | सोमवार ०३ नोव्हेंबर २०२५ | पाने ८ | रु. ४

संपादक : मिलिन्द बल्लाळ



# "प्रवास शब्दकळेचा" .....

## ऋणानुबंध पहिला - विद्यावाचस्पती डॉ. धनश्री लेले



शब्दकळेच्या प्रवासाला निघायचं ठरतं. दिवस ठरलेला असतो. हळूहळू सगळे जमायला लागतात. तहानलाडू, भूकलाडू सोबत घेऊन लहानांपासून थोरांपर्यंत अगदी सगळ्या वयोगटातील शब्दकळेच्या प्रवासाला निघालेले प्रवासी एकत्रित होतात. आज एका नव्या प्रवासाला जायचं असतं. आजचं रमणीय विषयस्थान कोणतं असणार याची कुजबुज सुरु असते किंवा ज्ञात असेल तर उत्सुकता असते. आणि या प्रवासाची वाहक, चालक, वाटाड्या, मार्गदर्शक जी all in one असते.... ती सामोरी येते, प्रसन्न, तेजस्वी, साक्षेपी. अत्यंत नम्र भावाने उपस्थित शब्दकळेच्या प्रवासी श्रोत्यांना नमस्कार करते आणि आजच्या शब्दप्रवासाच्या स्थानाचं नाव सांगते. सगळ्यांचेच चेहरे आनंदाने फुलतात. अगदी अर्ध्या मिनिटांसाठी तो आनंद एकमेकात वाटला जातो आणि शब्दकळेचा प्रवास सुरु होतो. प्रवास कोणताही कुठलाही असो, प्रवासीश्रोत्यांना आनंद असतो तो सोबत असणाऱ्या वाटाड्या(डी)चा.

अनेकदा आपला एखाद्या गाडीतून, बसमधून, टॅक्सीतून प्रवास सुरु झाला हे सुरुवातीलाच एक छानसा गचका बसून आपल्याला समजतं. अर्थात हे चालक किती तरबेज आहे त्यावरही असतं किंवा कित्येकदा प्रवाशांचा विचार न करता आपलं चालक कौशल्य दाखवण्याच्या दृष्टिकोनातूनही हे होत असतं. पण शब्दकळेच्या प्रवासाची चालक मात्र अंतरबाह्य, प्रवाशांचाच विचार करणारी असते. तिच्या बरोबरचे प्रवासीश्रोते वयाने ज्येष्ठ असतात. पण तिच्या मनातला भाव जबाबदारीचा असतो. आपण यांना शब्दकळेच्या प्रवासाला घेऊन निघालोय ना, मग त्याचं आकंठपान त्यांना करून द्यायचं. इथे मला भा. रा. तांब्यांची एक कविता आठवते,

**या बाळांनो, या रे या! लवकर भरभर सारे या!**
**मजा करा रे मजा करा! आज दिवस तुमचा समजा**
**स्वस्थ बसे तोचि फसे; नवभूमी दाविन मी,**
**या नगराला लागुनिया, सुंदर ती दुसरी दुनिया!**

या कवितेतून बालकांना जसं संबोधित केलंय तसाच काहीसा या शब्दकळेच्या प्रवासातल्या चालकाचा भरभरून देण्याचा दृष्टिकोन असतो. फक्त 'या बाळांनो' ऐवजी 'या साऱ्यांनो' म्हणायचं.

आज तिला एक नवीन विषयस्थान शब्दांच्या माध्यमातून चारही बाजूंनी उलगडून दाखवायचं असतं आणि ते ही आपण सर्वज्ञानी असल्याचा कुठलाही अभिनिवेश न बाळगता. अलगद, अलवार, आनंदात हा प्रवास सुरु होतो. संथगतीने शब्दकळेचा प्रवास सुरु होतो. इथे ब्रेक, हॉर्न वाजवला जात नाही, वाटेत रहदारी लागत नाही. आनंदात न्हाऊन निघत आपण पुढे पुढे जात राहतो ते चालकाची विषयावरची पकड आणि शब्दप्रभुत्व पाहत आणि ऐकत. आजच्या विषय स्थानाचं महत्व शब्दकळेतून प्रवाहायला सुरुवात होते. आता हे आपल्यासमोर कोणत्या स्वरूपात येत असतं? तर लहान लहान प्रश्नांच्या, उदाहरणांच्या रूपात संवाद साधणाऱ्या त्या व्यक्तीरेखा उलगडून येतात चालकाच्या मुखातून. म्हणजे ती आपल्यासमोर एक लहानसा प्रश्न उभा करते आणि त्याचं उत्तरंही लगेच देते. शिवाय एखाद्या सोप्या उदाहरणातून तेच उत्तर आणखी सुगम करून सांगते. त्यामुळे ते विषय स्थान तिच्या शब्दसौंदर्याने सर्वार्थाने आपल्या मनःचक्षुसमोर उभं राहतं. आपले कान ते श्रवण करत असतात आणि त्याचवेळी डोळे ते सारं सारं अनुभवत असतात. मघा मी म्हटलेल्या कवितेनुसार हे सगळं अगदी रसाळ शब्दात आणि जिवंत शब्दकळेमधून अगदी आपलेपणाने भरवलं जात असतं. आपण लहानग्यांना नाही का एखादी गोष्ट सांगताना ती रंगवून सांगतो. ते मुलही त्या कथेमधल्या राजा, सिंह, पक्षी, राक्षस या व्यक्तीरेखांमध्ये अक्षरशः गुंग होऊन जातं, कारण आपल्या नजरेने ते विश्व मुल अनुभवत असतं. इथेही थोरांचं अगदी तेच सुरु

**ऋणानुबंध जुळलेले ठाणेकर**

असतं. प्रवासात येणाऱ्या व्यक्तीरेखा आपल्या डोळ्यांसमोर उभ्या करून शब्दकळेचा तो जिवंत अनुभव ती चालक आपल्याला सतत देत असते.

मध्यंतरी, कालिदास जयंतीच्या निमित्ताने मेघदूत रसास्वादच्या शब्दकळा प्रवासात, अगदी यक्षाला मिळालेला शाप आणि त्याच्या एकांतवासापासून सुरु झालेला प्रवास त्याच्या निरोप्याचं काम करणाऱ्या ढगाबरोबर घडणाऱ्या संवादातून पुढे जात राहतो. यक्षाच्या मनातले प्रश्न आणि शंका ऐकत आणि ढगाच्या साथीने अनेक स्थानांना भेट देत आपण झगमगत्या अलकापुरीमध्ये कधी पोहोचतो ते लक्षातही येत नाही, इतके चालकाच्या शब्दकळेमध्ये आपण त्या प्रवासातलेच एक होऊन जात राहतो. हीच असते तिच्या भाषेची ताकद. शब्द नाट्य! फक्त शब्दांनी उभं रहाणारं हे नाट्य आपल्याला एक सजीव अनुभव देऊन जातं. या प्रवासाचं आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे या शब्दकळा श्रवणाचा कुठेही आणि किंचितही थकवा, कंटाळा येत नाही, कारण काय? तर ती घडाघडा, भडाभडा वाहत नाही, तर झुळझुळ वाहते, आपल्याशी छान संवाद साधत राहते. थोडक्यात ती आपल्याशी अगदी मोकळ्या गप्पा मारत वाहते. आणि तरीही त्यातून जे सांगायचं असतं, जे समजवायचं असतं ते मात्र नेमकेपणाने मांडत जाते. शब्दकळेच्या देहबोलीतून एकच भाव जाणवत असतो,


"हृदया हृदय एक झाले, ये हृदयीचे ते हृदयी घातले."

"शहाणे करून सोडावे सकळ जन" ही जबाबदारी आपल्यावरच आहे हा भाव तिथे अजिबात जाणवत नाही, तर संतसहित्यामधल्या, आपल्या पुरातन संस्कृतीमधल्या ज्या चांगल्या, सुंदर, संस्कारी गोष्टी ज्ञात आहेत त्या तुमच्यापर्यंत नेमकेपणाने पोहोचवायच्या आहेत, त्यातून काय घ्यायचं हे तुम्हीच ठरवा हा भाव दिसत असतो. अर्थात यातून काय घ्यायचं हे ही ती शब्दकळा सांगून जाते पण अगदी सहजपणे. सोबतच्या प्रवासी श्रोत्यांना मनापासून मोठेपण देत हे सगळं ती आपल्या मनावर रुजवत असते.

हे सारं अनुभवत आणि शब्दकळेचा हा मन भारून टाकणारा प्रवास संपवून आपण पुन्हा वर्तमानातल्या आपल्या मूळ जागी कधी येऊन पोहोचतो हे कळतही नाही. जाणीव होऊ लागते, 'किती सुंदर आहे हे सगळं. आपण मात्र आपल्या विचार आचारांनी आपलं जीवन गढूळ करून टाकत असतो. कशासाठी एव्हढं आत्मकेंद्रित होऊन मी -माझं -मला करत राहायचं. प्रवासात ऐकलेल्या या गोष्टींचा मनापासून आनंद घेऊया आणि इतरांना देऊया.'

आता ही भावना आपल्यामध्ये किती मिनिटं, किती तास, किती दिवस टिकते हा एक वेगळा विषय, पण ती भावना मनात उमलणं हेच असतं त्या शब्दकळेचं यश.

ती चालक मात्र या कशातही गुंतून न पडता एका नव्या प्रवासाची तयारी करत असते. मग कधी ती "विश्वरूपयोगदर्शनातून" कुरुक्षेत्रावर नेते, "दासबोधातली सौंदर्यस्थळं" वेचून दाखवते, जगन्नाथ पंडितांनी लिहिलेल्या "गंगालहरी"मधून यथेच्छ शब्द प्रवास करून आणते, "अभिज्ञानशाकुन्तलं मधल्या शकुंतला- दुष्यन्त राजाच्या प्रेममिलन आणि वियोग या दोन्हीचा नेमका अनुभव देऊन जाते, युगपुरुष स्वामी विवेकानंदांच्या शब्दभेटीचा प्रवास घडवून आणताना जितकी रंगून जाते तितकीच कबीर सांगतानाही तन्मय होते. असे अनेक विषय, अनेक प्रवास.



**प्रसाद कुळकर्णी, मुंबई**
**९७६९०८९४१२**

तिच्या शब्दकळेचा हा प्रवास सतत सुरूच असतो, सोबतचे प्रवासी श्रोते बदलत असतात, वाढत असतात, नवीन येत असतात. आणि गंमत म्हणजे हा प्रत्यक्षातला शब्दप्रवास असो किंवा ध्वनीमुद्रित शब्दप्रवास असो अथवा दृकश्राव्य माध्यमातला प्रवास असो. शब्दकळेची तन्मयता तीच जाणवते आणि श्रोत्यांना एक सुंदर, मन भरून आणि भारून टाकणारा दैवी अनुभव देऊन जाते हे मात्र नक्की, कारण?....कारण तिचं ब्रिद एकच असतं, "हृदया हृदय एक झाले, ये हृदयीचे ते हृदयी घातले."

पुढच्या आठवड्यात ऋणानुबंध दुसरा.....

■ ■ ■

**वाचू पुस्तक, वाचू माणसे**
**वाचू निसर्ग सभोवतालचा**
**वाचनाने होऊ समृद्ध**
**आनंद घेऊ जगण्याचा ।।**

# वाचाल तर वाचाल

लहानपणापासूनच आपण शालेय, महाविद्यालयाच्या माध्यमातून पाठ्य-पुस्तकांचे वाचन करत असतो. त्यातून जगाचे दर्शन घडून देश-विदेशातलं राहणीमान, भाषा, वेष, प्रथा, खाद्यपदार्थ, संस्कृती, इतिहास, संशोधन याला आपण सुपरिचित होत असतो. विविध भाषेतील गोष्टीस्वरूप धडे आणि कविता यांतून हळूहळू वाचनाची गोडी लागून सखोल अध्ययन होते. कथा-कादंबऱ्या, ग्रंथ, नाटकं यांच्या रसग्रहणातून आनंदाची अनुभूती मिळते. मोठ्याने वाचन केल्याने उच्चारांमध्ये सुस्पष्टता येऊन अस्खलितपणा वाढीस लागतो. निरंतर वाचनाने सहजता-स्वाभाविकता वाढते. लिखाणातील भाव हृदयापर्यंत पोहोचून चेहऱ्यावरही उमटतात. आपण स्वतःसाठी मूकपणे केलेल्या वाचनातून आशय चांगला समजतो. वाचनशैली अंगी रुजल्यामुळे माहिती संग्रह वाढतो आणि आपल्यात दूरदृष्टीचा संचार होतो. पुस्तकाच्या रूपाने आपल्याला एक खरा मित्र मिळतो, जो योग्य-अयोग्य गोष्टींची जाणीव करून देतो. माणसाला माणूस बनवतो. वाचन आपल्याला अंतर्मुख होऊन विचार करायला शिकवतं. त्यामुळे जीवनात सुसूत्रता येऊन जीवनाला एक आयाम प्राप्त होतो.

वाणीवर आणि मनावर सुसंस्कार होऊन आपल्या व्यक्तिमत्त्वाचा अंतर्बाह्य विकास होतो. सर्जनशीलतेला, कल्पकतेला वाव मिळून उत्तम कलाकृती निर्माण होते. वाचनाने शब्दसंग्रह वाढून भाषा कौशल्य विकसित होतं. बोलण्याची कला अवगत होऊन संवादांची देवाणघेवाण उत्तमरीतीने होते. वाचनामुळे आकलनशक्ती वाढते, लेखनही सुधारते. विविध भाषा तसेच विषय अभ्यासल्याने जागतिक पातळीवर संवाद साधण्यासाठी, काम करण्यासाठी आत्मविश्वास बळावतो. जीवनावश्यक गोष्टींचं ज्ञान प्राप्त झाल्यामुळे अर्थार्जनाचं भय नाहीसं होऊन मानसिक स्वास्थ लाभतं आणि आपण जीवनाचा पुरेपूर आनंद घेऊ शकतो.

खरंच, माणसाला समृद्ध जीवन जगायचे असेल, तर वाचनाला पर्याय नाही. कारण वाचनानेच माणसाच्या ज्ञानात भर पडून जीवन जगणे सुलभ होऊ शकते. तसं तर अशिक्षित-सुशिक्षित आपापल्यापरीने सगळेच जगतात, पण वाचनाने वैचारिक प्रगल्भता येते आणि जीवनाला योग्य दिशा प्राप्त होते. कारण वाचन हे केवळ पुस्तकांचे नसून विविध प्रकारचे असते, जसे- माणसे, निसर्ग, आपला परिसर, कार्यक्षेत्र आणि जो असे सर्व प्रकारचे वाचन करण्यास शिकतो, तो तर्कशुद्ध पद्धतीने जीवन जगू शकतो. अगदी दैनंदिन जीवनात येणाऱ्या छोट्या-छोट्या अडचणी सोडवताना आपल्याला किती विचार करावा लागतो. यासाठीही अभ्यास आणि अनुभव आपल्या गाठीशी असावा लागतो. त्यातूनच योग्य गोष्टींची सांगड घालत आपण अचूक निर्णय घेऊ शकतो. कारण वाचन आणि अभ्यासानेच आपल्यात बुद्धी, विचार आणि निर्णयक्षमता वाढीस लागत असते.

जीवनात घडणाऱ्या घटनाही आपण वाचायला शिकलं पाहिजे. म्हणजे जेव्हा एखादी घटना घडते, तेव्हा ती घडायची होती म्हणून घडली असे न म्हणता ती का घडली? त्याचे परिणाम-दुष्परिणाम यावर सखोल विचार केला पाहिजे. त्यातूनच भल्याबुऱ्याची जाणीव आपल्याला होत असते. हेच अनुभव पुढे एखाद्या जटिल प्रसंगी आपल्याला उपयोगी पडत असतात. विविध कार्यक्षेत्रे आणि त्यात यशस्वी झालेली कितीतरी माणसे आपल्या आजूबाजूला वावरत असतात. ती का यशस्वी होतात? जिद्द, चिकाटी, कष्ट करण्याची तयारी, बुद्धिमत्ता हे सगळं त्यांच्याकडे असतंच, पण त्याहीपेक्षा वैविध्यपूर्ण वाचन, त्यावर मनन-चिंतन आणि सातत्याने अभ्यास करण्याची त्यांची प्रवृत्ती असते, जी त्यांना यशोशिखरावर नेते. त्याचप्रमाणे माणसे वाचण्याची कलाही त्यांच्यात विकसित झालेली असते. कारण आपल्या आजूबाजूला जशी चांगली माणसं असतात, तशी वाईट माणसंही वावरत असतात. या वाईट माणसांपासून आपल्याला स्वतःला सुरक्षित ठेवायचे असेल, आपली फसवणूक होऊ द्यायची नसेल तर आपल्याला माणसे वाचायला शिकणेही गरजेचे असते. एखाद्याबद्दल ईर्ष्या-मत्सर असणे, हा मानवी स्वभाव आहे. अशा व्यक्तींना आपली प्रगती खुपत राहते. मग त्या व्यक्ती अनेक प्रकारे आपल्या आयुष्यात अडथळे निर्माण करण्याचा प्रयत्न करतात. अशावेळी त्यांचा कुटील डाव आपल्याला ओळखता आला पाहिजे. तरच प्रसंगावधान राखून आपण त्यावर मात करू शकतो. याला प्रासंगिक वाचन म्हणतात. ही वृत्ती आपल्या ठायी असेल तर आपण सावधपणाने खेळी खेळून आपलं नुकसान टाळू शकतो आणि निश्चितपणे ध्येय गाठू शकतो.

हल्लीच्या काळात तर अपप्रवृत्तींचा सुकाळ माजला आहे. एकीकडे विकसित तंत्रज्ञान तर दुसरीकडे वाढती बेरोजगारी यामुळे चोऱ्या, लबाड्या, फसवणुकीचे प्रकारही खूपच वाढलेले आहेत. समाजात घडणाऱ्या या घटनांचे आपण भान ठेवले नाही, वृत्तपत्र, अंक वाचनातून किंवा इतर प्रसार माध्यमांद्वारे ही माहिती घेतली नाही, आपण सजग राहिले नाही तर आपलीही फसवणूक होऊ शकते. एखाद्याकडे नुसतीच हुशारी आहे. पण वाचन आणि अभ्यासातून आपल्या बुद्धीत भर टाकण्याची प्रवृत्ती नसेल तर तो कालांतराने मागेच पडणार आहे. त्याचे जीवन अधोगतीला लागून संपुष्टात यायला वेळ लागणार नाही. काही अपवाद सोडले तर दारिद्य रेषेखालील तसेच खेड्यापाड्यातील, शहरातील असंख्य निरक्षर लोकं शिक्षणाअभावी अधोगतीमुळे म्हणा किंवा फसवणुकीमुळे म्हणा, मरेपर्यंत दारिद्यातच खितपत पडतात. त्यांना प्रगतीच्या संधीच प्राप्त होत नाहीत.

पण निरक्षर असूनसुद्धा काही मात्र आपल्या विचारधनाने, प्रतिभेने, एखाद्या जन्मजात देणगीने, कौशल्याने परिस्थितीवर मात करून पुढे जातात. उदा. बहिणाबाई चौधरी. माणसं, शेती, निसर्ग यांप्रती अपार जिव्हाळा-प्रेमातून त्यांनी शेतकाम, घरकाम करता-करता उत्स्फूर्त काव्य रचली आणि अजरामर झाल्या. त्या जरी अशिक्षित होत्या तरी कष्टप्रद जीवन जगता-जगता जीवनाच्या शाळेत अनुभवाने शहाण्या झाल्या आणि त्यांनी डोळसपणे या जगाकडे पाहिले. पुस्तकाविना स्वतःच्या आकलनाने वाचन-चिंतन करून, सूक्ष्म अभ्यास करून दैनंदिन जीवनातलं ज्ञान, जगण्याची कला आत्मसात केली. त्याचप्रमाणे संत कबीरही निरक्षर होते. स्वतःच्या जाती-धर्माला अनभिज्ञ असलेले आणि खऱ्या आई-वडिलांविना वाढलेले कबीर देश भ्रमंतीतून जीवनाचं तत्वज्ञान जाणतात आणि दोहे-अभंगाच्या माध्यमातून तत्कालीन समाजाचे अवगुण परखडपणे मांडतात. भटकंतीतून त्यांनी जे पाहिलं, वाचलं, अनुभवलं, त्यातून त्यांना स्फुरलेले सात्विक विचार त्यांनी उपदेशातून, संदेशातून समाजासमोर ठेवले आणि देश सद्गुणी व्हावा, एकजुटीने वागावा म्हणून आटोकाट प्रयत्न केले. ही दोन उदाहरणे आपल्याला हेच दाखवतात की पुस्तकी वाचन तर हवेच, पण त्यासोबत आपण आजूबाजूचं सर्वच वाचायला शिकलं पाहिजे.

क्षेत्र कोणतंही असो- उद्योग, क्रीडा, कला, वैद्यकीय, तांत्रिक, शिक्षण, प्रत्येकाला त्यात कार्यरत राहण्यासाठी, यश संपादन करण्यासाठी वाचनाची आवश्यकता तर असतेच. त्याशिवाय ती व्यक्ती त्या-त्या क्षेत्राला, त्यांच्या कामाला योग्य न्याय देऊच शकत नाही. कारण वाचनानेच विचार प्रक्रिया वाढत असते आणि त्यातूनच संशोधन वृत्ती जागृत होऊन सखोल ज्ञान घेण्याकडे आपला कल वाढतो. त्यातूनच आपण कौशल्य प्राप्त करतो. जेव्हा ही प्रक्रिया निरंतर सुरु राहते, तेव्हा शास्त्रज्ञ निर्माण होतात आणि जेव्हा काही काळानंतर तुम्ही ही विचार प्रक्रिया थांबवता किंवा काही कारणाने ती थांबते, तिथे आपली बुद्धी खुंटीत होते आणि प्रगतीच्या वाटेत अडथळे निर्माण होतात. म्हणूनच व्यक्ती सामान्य असो, सर्वसाधारण असो की बुद्धिमान असो, प्रत्येकाला जीवनाची वाटचाल प्रगतीपथावर ठेवण्यासाठी वाचनाला पर्याय नाही.

पूर्वी पुस्तकं मिळण्याचं एकमेव ठिकाण म्हणजे ग्रंथालय होतं. तिथे जाऊन पुस्तकं आणून वाचून परत करावी लागत होती. पण मनोरंजनाची साधने कमी असल्याने वाचन संस्कृतीला महत्त्व प्राप्त झाले होते. बौद्धिक विकासासाठी लोकांचा पुस्तकं वाचनावर अधिक भर असे. तसेच कौटुंबिक, आर्थिक, सामाजिक, भावनिक आणि मानसिकदृष्ट्या परिपक्व होण्यासाठी वाचनच उपयुक्त आहे, यावर लोकांचा ठाम विश्वास होता. पण आता डिजिटलायझेशनमुळे कोणतंही पुस्तक ऑनलाईन साईटवर सहज उपलब्ध असतं. इंटरनेटमुळे संपूर्ण जगाची माहिती एका क्लिकवर आपल्याला उपलब्ध होते. पण मनोरंजनाची साधने वाढल्यामुळे वाचनासाठी वेळच कमी पडतो.


डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी असं म्हटलं आहे की वाचाल तर वाचाल! कारण वाचनाच्या माध्यमातूनच मानवाचे जीवन घडू शकते. म्हणूनच वाचन संस्कृतीला पुन्हा एकदा सुगीचे दिवस येण्यासाठी तिची जीवापाड जपणूक करणे आणि त्याचबरोबर शाळा-कॉलेज, संस्था, सरकारतर्फे विविध उपक्रमांद्वारे आबालवृद्धांमध्ये रुजवणे, यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न होणे आवश्यक आहे. तरच या देशाचे भविष्य उज्ज्वल राहील.

**अध्ययनं ज्ञानस्य मूलम्, विद्या सर्वस्य भूषणम्!**

**- सौ. नंदा कोकाटे, ठाणे**

■ ■ ■

# ठाणेवैभव BALवैभव



## BAL वैभव वाचू या , बक्षीस मिळवू या!

### English Worksheet

**TO BE**

Choose am/is/are or was/were

**TODAY**

1. The weather ___ fine.
2. Chris ___ tired.
3. We ___ at the park.
4. I ___ hungry.
5. You ___ late.
6. My cat ___ lazy.
7. My friends ___ at home.
8. I ___ with my sister.
9. We ___ at work.
10. The film ___ nice.
11. I ___ excited.
12. The guests ___ happy.
13. My coffee ___ hot.
14. Travis and Jane ___ married.
15. Lucy ___ single.

**YESTERDAY**

1. The weather ___ fine.
2. Chris ___ tired.
3. We ___ at the park.
4. I ___ hungry.
5. You ___ late.
6. My cat ___ lazy.
7. My friends ___ at home.
8. I ___ with my sister.
9. We ___ at work.
10. The film ___ nice.
11. I ___ excited.
12. The guests ___ happy.
13. My coffee ___ hot.
14. Travis and Jane ___ married.
15. Lucy ___ single.

Make the sentences negative and interrogative.

### Maths Worksheet

a. 25 × 24
ç. 28 × 25
f. 27 × 19
h. 45 × 16
b. 39 × 18
d. 27 × 25
g. 39 × 15
i. 50 × 19
c. 35 × 24
e. 28 × 17
ğ. 29 × 24
ı. 26 × 19

### Hindi Worksheet

**परीक्षा की तैयारी**

रवि और सुरेश की वार्षिक परीक्षाएँ नजदीक आ रही थीं। दोनों दोस्त हर दिन मिलकर पढ़ाई करते थे। सुरेश गणित में बहुत अच्छा था, जबकि रवि को विज्ञान में अधिक रुचि थी। इसलिए, दोनों एक-दूसरे की मदद करते थे। दोनों ने मिलकर खूब मेहनत की और अच्छे अंक प्राप्त करने का लक्ष्य रखा।

उपरोक्त कहानी को पढ़कर खाली स्थान भरो। :


1. रवि और सुरेश की __________ परीक्षाएँ नजदीक आ रही थीं।
2. सुरेश __________ में बहुत अच्छा था।
3. रवि को __________ में अधिक रुचि थी।
4. दोनों __________ की मदद करते थे।
5. दोनों ने अच्छे __________ प्राप्त करने का लक्ष्य रखा।




### Coloring Sheets



### Find the way



### Word Puzzles





## ठाणेवैभव अखंड वाचनयज्ञ २०२५

**सदर संयोजन : अक्षरमंच सामाजिक सांस्कृतिक प्रतिष्ठान - डॉ योगेश जोशी.**

**माझे आयडॉल - कथा क्रमांक २९६**

### शाहरुख खान



बॉलीवूडचा बादशाह किंग खान अर्थात शाहरुख खानचा जन्म 2 नोव्हेंबर 1965 रोजी नवी दिल्लीत झाला. शिक्षणानंतर 1980 च्या दशकाच्या उत्तरार्धात दूरदर्शन मालिकांमधून आपल्या कारकिर्दीची सुरुवात केली. 1992 मध्ये दीवाना चित्रपटाद्वारे बॉलिवूडमध्ये पदार्पण केले. सुरुवातीला त्याला बाजीगर डर या चित्रपटांमध्ये खलनायकी भूमिकांसाठी ओळखले गेले. त्यानंतर दिलवाले दुल्हनियाँ ले जाएंगे , दिल तो पागल है , कुछ कुछ होता है, मोहब्बतें , कभी खुशी कभी गम... , कल हो ना हो , वीर-झारा, कभी अलविदा ना कहना या चित्रपटांतून सर्वाधिक कमाई करणाऱ्या रोमँटिक चित्रपटांच्या मालिकेत अभिनय करून स्वतःची ओळख निर्माण केली. देवदास, स्वदेस , चक दे इंडिया, माय नेम इज खान ,ओम शांती ओम, रब ने बना दी जोडी, चेन्नई एक्स्प्रेस, हॅपी न्यू इयर या विनोदी चित्रपटांसह आणखी व्यावसायिक यश त्याला मिळाले. 2015 पर्यंत, खान चित्रपट निर्मिती कंपनी रेड चिलीज एंटरटेनमेंट आणि तिच्या उपकंपन्यांचा सह-अध्यक्ष आहे. तसेच तो इंडियन प्रीमियर लीग क्रिकेट संघ कोलकाता नाइट रायडर्स आणि कॅरिबियन प्रीमियर लीग संघ त्रिनबागो नाइट रायडर्सचा सह-मालक आहे. त्याच्या अनेक जाहिराती आणि उद्योजकता उपक्रमांमुळे माध्यमे त्याला "ब्रँड एसआरके" म्हणते. अनेकदा तो दूरदर्शन प्रस्तुतकर्ता आणि रंगमंच सादरकर्ता म्हणून दिसतो. खानने आरोग्य सेवा आणि आपत्ती निवारण उपक्रमांमध्ये परोपकारी कामे केली आहेत. मुलांच्या शिक्षणाच्या समर्थनासाठी त्याला 2011 मध्ये युनेस्कोच्या पिरामाइड कॉन मार्नी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.टाईम मासिकाने त्याचा उल्लेख जगातील 100 सर्वात प्रभावशाली व्यक्तींमध्ये केला. 14 फिल्मफेअर पुरस्कारांसह अनेक पुरस्कार मिळवले आहेत. भारत सरकारकडून पद्मश्री पुरस्काराने तर फ्रान्स सरकारकडून त्याला ऑर्डे डेस आर्ट्स एट डेस लेट्रेस आणि लीजन ऑफ ऑनरने सन्मानित करण्यात आले आहे.

**- संकेत खर्डीकर**

**शाहरुख खान याने कोणत्या चित्रपटाद्वारे बॉलीवूडमध्ये पदार्पण केले?**
**1) फौजी 2) दिवाना 3) डर 4) दिल तो पागल है**

**स्पर्धकांसाठी सूचना**

**1) वाचन संस्कार स्पर्धा इयत्ता 5 वी ते 10 च्या विद्यार्थ्यांसाठी खुली आहे.**
**2) विद्यार्थ्यांनी वरील कथा वाचून त्याच दिवशी रात्री 11 वाजेपर्यंत प्रश्नाचे उत्तर लिहून 9892316320 या व्हॉट्सअप क्रमांकावर पाठवायचे आहे. आपले उत्तर खालील स्वरूपात पाठवावे. ( कृपया या क्रमांकावर फोन करू नये. )**
**3) अचूक उत्तर देणाऱ्या एका विद्यार्थ्याचे लकी ड्रॉ पद्धतीने नाव काढले जाईल. त्या -त्या आठवड्यातील प्रत्येक दिवशीच्या विजेत्यांची नावे दर रविवारी बालवैभव सदरात जाहीर करण्यात येतील.**
**4) प्रत्येक दिवशीच्या विजेत्यास पुस्तक स्वरूपात पारितोषिक व सन्मानपत्र दिले जाईल. सदर पारितोषिक प्रत्येक महिन्याच्या शेवटच्या शनिवारी सायंकाळी 3 ते 5 या दरम्यान ठाणेवैभवच्या ठाणे कार्यालयातून विद्यार्थ्याने प्रत्यक्ष येऊन घेऊन जायचे आहे. पारितोषिक पोस्टाने वा कुरिअरने पाठवले जाणार नाही.**
**5) सदर उपक्रम 1 जानेवारी 2025 ते 31 डिसेंबर 2025 असा संपूर्ण वर्षभर सुरु राहणार आहे.**

- माझे आयडॉल - कथा क्रमांक......
- उत्तर-पर्याय क्रमांक......
- स्पर्धकाचे नाव: ........................
- इयत्ता: ....................
- शाळा नाव व पत्ता: ...................

DAILY THANEVAIBHAV RNI REGD NO. 27878/ 75, POSTAL NO. THC/186/2018-2021
thanevaibhav Thane Vaibhav | Thane Vaibhav | thanevaibhav
कल्याण-डोंबिवली, नवी मुंबई, मीरा-भाईंदर, अंबरनाथ-बदलापूर, भिवंडी, उल्हासनगर, मुरबाड, शहापूर.

स्थापना : २५ ऑगस्ट १९७५
www.thanevaibhav.in

# ठाणेवैभव

ठाणे जिल्ह्याचे सर्वाधिक खपाचे परिपूर्ण दैनिक । इष्ट ते छापणार । संस्थापक : नरेन्द्र बल्लाळ

भारतीय सौर दिनांक कार्तिक १२ शके १९४५ । वर्ष ५१ । अंक ६७ । सोमवार ०३ नोव्हेंबर २०२५ । पाने ८ । रु. ४
संपादक : मिलिन्द बल्लाळ

## पॉइन्ट ब्लँक

# शक्यतेच्या सुईचे काय?

घटना तशी विचित्रच. तिचे वर्णन माध्यमांनी थरारक वगैरे केले आहे. एखाद्या चित्रपटाला शोभेल असेही काहींचे म्हणणे. आम्हाला मात्र ही बातमी मुंबईत घडली होती की अमेरिकेतील एखाद्या शहरात असेच वाटून गेले. एखादी माथेफिरु व्यक्ती चर्चमध्ये, मॉलमध्ये किंवा शाळेत घुसून बेछुट गोळीबार करण्याच्या घटना परदेशात होणे नवीन नाही. परंतु भारतात आणि तेही आपल्या घराजवळ असलेल्या मुंबईतील पवई भागात एखादा तथाकथित माथेफिरु इसम १७ मुलांना ओलीस ठेऊन आपल्या मागण्यांच्या मोबदल्यात त्यांच्याजवळील 'सावजां'चा सौदा करतो हे आक्रित घडले! सनसनाटी बातमीची चटक लागलेल्या माध्यमांना आणि त्याचा आस्वाद (!) घेणाऱ्या नागरिकांची संख्या वाढत असताना पवईतील हे थरारनाट्य जणु पर्वणीच ठरावी. आमच्यासारख्या हजारो संयमी नागरीकांना या गोष्टी रूचत नसल्या तरी त्या स्वीकारण्यापलिकडे गत्यंतरही राहिलेले नाही. अर्थात काळजीपोटी अशा घटना का घडतात याची कारणमीमांसा करणे हे कर्तव्य वाटत आहे आणि त्याचे प्रांजळ कारण म्हणजे अशा दुर्दैवी घटनांची पुनर्रावृत्ती होऊ नये हाच एकमेव हेतू.

नागपूर येथे रहाणारा कोणी रोहित आर्या याने ऑडिशनच्या सबबीखाली १७ मुलांसह २० जणांना ओलिस ठेवले होते. हे कृत्य करण्यामागे त्याच्या सरकारकडे काही मागण्या होत्या आणि त्याला स्वच्छता मॉनिटर प्रकल्पापोटी दोन कोटी रूपये येणे असून ते मिळावेत ही मागणी होती. तत्कालिन शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी आर्या यांच्या मागणीत तथ्य नसल्याचा खुलासा केला आहे. आर्या जीवंत नसल्यामुळे हे प्रकरण पुढे जाण्याची शक्यता नाही. त्यामुळे त्याबाबतचे गूढ कायम रहाणार आणि अष्टोप्रहर आदळत राहणाऱ्या सनसनाटी बातम्यांप्रमाणे ही बातमीही विरून जाणार!



मिलिन्द बल्लाळ

सर्वसामान्य जनतेच्या मनात मात्र काही प्रश्न पुढील काही दिवस रेंगाळत रहाणार. आर्याच्या मानसिक अवस्थेपासून खरोखरीच असे कोट्यवधींचे व्यवहार होत असतात का? ते पूर्ण होताना नेमके लाभार्थी कोण असतात आणि व्यवहार अपूर्ण राहिला तर कोणाला त्याचा फटका बसत असतो? अशा व्यवहारांची शक्यता या प्रकरणामागे दडली असेल तर मग सरकार नामक यंत्रणेबद्दल शंका उपस्थित होते.

मंत्रालयात कामे कशी करून घेतली जातात याच्या सुरस कथा राजकीय आणि प्रशासकीय वर्तुळातून ऐकू येत असतात. गंमत म्हणजे या अनैतिकतेबद्दल कोणालाच आश्चर्य वगैरे वाटत नसते. जणू काही हे सर्व रीतसर (रूटीन) आहे. मंत्री, त्यांचे जवळचे कार्यकर्ते, ओएसडी, मर्जीतले अधिकारी वगैरे अशी ही साखळी असल्याचे उघडपणे बोलले जात असते. या लोकांना हाताशी धरले की काम फत्ते होत असते. जोपर्यंत तसे होते त्याबद्दल चकार शब्दही कोणी बोलत नाही. परंतु ही साखळी कधी तुटली तर त्याबाबत कांगावा जरूर होतो मात्र ज्याचे काम होत नाही तोच हा कांगावा करतो. मंत्रीमहोदयांचा प्रथमदर्शनी संबंध येत नसला तरी ही साखळी त्यांच्या सहकार्याशिवाय पूर्णही होत नसते. या प्रकरणातील मुले सुरक्षित राहिली ही समाधानाची बाब असली तरी या घटनेकडे विकृत मंडळी कशी पाहतात याचा विचार केला तर चिंता वाटतेच. असे कथित व्यवहार होतच नसते तर आर्याच्या डोक्यात ही कल्पना तरी आली असती का! संधीचे दरवाजे किलकिले केले जातात, कालांतराने ते सताड उघडे होतात आणि मग या वादग्रस्त व्यवहारांना मान्यताही मिळते. या अपहरण नाट्यामुळे सरकारला आरशात पाहण्याची संधी दिली आहे. आर्या प्रकरणात सरकारकडे संशयाची सुई वळली आहे. त्यात कदाचित तथ्य नसेलही. संशयाचे सोडून द्या पण शक्यतेची सुई तर वळत असतेच ना? ही बाब गंभीर आहे. देशातील राजकारणाचे ढासळत्या चारित्र्यावर भाष्य करणारी ही घटना आहे. या घटनेत किती तथ्य होते हे सांगता येत नसले तर त्यामागच्या घटनाक्रमात तर तथ्य नाकारता येणार नाही. आपली संपूर्ण सिस्टम ओलिस तर ठेवली नाही ना आपण?

## 'बाहुबली'चे यशस्वी प्रक्षेपण!



नवी दिल्ली: भारतीय अंतराळ संशोधन संस्थेने (इस्रो) रविवारी "बाहुबली" रॉकेटचा वापर करून आतापर्यंतचा सर्वात शक्तीशाली संप्रेषण उपग्रह, सीएमएस-03, कक्षेत स्थापित केला आहे. या उपग्रहाचे वजन 4,410 किलोग्रॅम आहे. इस्रोने दिलेल्या माहितीनुसार सीएमएस-03 हे एलव्हीएम3-एम5 रॉकेट वापरून लाँच करण्यात आले. हे मिशन इस्रोसाठी आणखी एक मोठे यश आहे.

# आजपासून ठामपा उडवणार कारवाईचा बार

## शीळ-डायघरनंतर कळवा, बाळकुममध्ये अनधिकृत बांधकामांवर कारवाई

**ठाणे : ठाणे महापालिका हद्दीतील अनधिकृत बांधकामांच्या विरोधात पुन्हा एकदा अतिक्रमण विभाग सक्रिय झाला असून मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार बांधकामावर उद्यापासून हातोडा पडणार आहे. त्यामुळे अशा इमारतींमध्ये राहणाऱ्या नागरिकांनी त्यांची राहण्याची सोय स्वतःच करावी, महापालिका पुनर्वसन करणार नसल्याने घरे खाली करावीत, अशा सूचना करण्यात आल्याने रहिवाशांचे धाबे दणाणले आहेत.**




शीळ-डायघर येथिल अनधिकृत इमारतींच्या विरोधात कारवाई करण्याचे आदेश दिल्यानंतर मुंबई उच्च न्यायालयाने शहरातील इतर भागामधील अनधिकृत इमारतींविरोधात कारवाई करण्याचे आदेश दिले होते.

त्यानुसार ठाणे महापालिका प्रशासनाने कळवा भागातील 51 इमारती आणि बाळकूम भागातील अनधिकृत इमारतींच्या विरोधात कारवाई करण्याची नोटीस बजावली होती. बाळकूम परिसरातील इमारतींचा पाणीपुरवठा (पान ४ वर...)

# ठाणे जिल्ह्यात सहा महिने पावसाची धुंवाधार बॅटिंग

## जिल्ह्यात १०८ टक्के पाऊस | ठाणे शहरात मात्र कमी धावा



**ठाणे :** ठाणे जिल्ह्यात मे महिन्यापासून रिपरिप सुरु केलेल्या पावसाने ऑक्टोबरपर्यंत सरासरी 108 टक्के नोंद करत धुवाधार बॅटींग केली. नोव्हेंबर उजाडल्यानंतरही त्याने जोर कायम ठेवला आहे. ठाणे शहरात मात्र पावसाला मागील वर्षाएवढी सरासरी गाठता आलेली नाही. ठाणे महापालिका क्षेत्रामध्ये आतापर्यंत 3307 मि.मि.पावसाची नोंद झाली असून गेल्या वर्षीच्या तुलनेत सुमारे 150 मि.मि. कमी नोंद झाली आहे.

हवामान बदलामुळे मे महिन्यापासूनच पावसाच्या सरी बरसायला सुरुवात झाली आहे. ऊन-पावसाचा खेळ रंगात असताना जून ते सप्टेंबरच्या शेवटापर्यंत पावसाची बॅटींग सुरूच होती. यामध्ये पावसाने कधी चौकार तर कधी षटकार मारल्याने जिल्ह्यात अनेकवेळा पुरपरिस्थिती निर्माण झाली. (पान ४ वर...)

# कॅन्सर हा आजार नेमका काय आहे ?



**डॉ. अनिल हेरूर,**
**संचालक - कर्करोग विज्ञान**
**किम्स हॉस्पिटल, ठाणे**

कॅन्सर हा आजर आज आपल्याला अजगरासारखा विळखा घालून बसला आहे. हा आजार बाहेरून आलेला नसून आपल्या शरीरातील पेशींमधील बिघाड झाल्यामुळे होणारा आजार आहे. आपल्या शरीरातील पेशी नेहमी प्रजनन आणि विभाजन होत असतं. या प्रक्रियेमध्ये जेव्हा काहीतरी बिघाड होतो, तेव्हा त्यामध्ये एक अशी पेशी निर्माण होते की जी सतत विभाजन होत राहत. असे विभाजन होत राहून एकाचे दोन, दोनाचे चार आणि चाराचे सोळा होत एक गाठ बनते आणि त्या गाठीला आपण ट्युमर किंवा कॅन्सर असे म्हणतो. जे ट्यूमर एका भागातून दुसऱ्या भागात पसरतात. म्हणजे उदा. स्तनांमध्ये गाठ झाली असेल आणि मग ती पुढे जाऊन मेंदूमध्ये किंवा हाडांमध्ये पसरणारी असेल तर मग त्याला आपण कॅन्सर असे संबोधतो.

असे काय होते की शरीरातील पेशी रिबेलियास होतात किंवा आपल्यावरच उलटतात. कारण पेशींवर जर सतत अन्याय होत गेला. त्यात कोणतेही व्यसन असो, प्रदूषण असेल, खाण्यापिण्याच्या तऱ्हा असतील या सगळ्यांमुळे या पेशींवर सतत आघात होत असतात. या आघातांमुळे या पेशींवर मूलभूत बदल होतात. या बदलांमुळेच पुढे कॅन्सर होतो. आपल्याला असे वाटते की कॅन्सर हा फक्त तंबाखू खाण्यामुळेच होतो. पण तसे नसून कॅन्सर हा आपल्या जीवनशैलीमुळे देखील होतो. अर्थात तंबाखू हे कॅन्सरचे मुख्य कारण आहे. तंबाखूमुळे फुफ्फुसांचे कॅन्सर तर होतात परंतु त्याबरोबरच सायनसचे कॅन्सर, अन्ननलिकेचे कॅन्सर, यकृताचे कॅन्सर, आणि तसेच मूत्राशयाचे कॅन्सर सुद्धा होतात.


तंबाखूचे जे विविध प्रकार आहेत त्या प्रत्येकामुळे कॅन्सर होतो. स्मोकिंगमुळे शरीरात हे सर्व कॅन्सर होतात तर गुटखा भारतीय उपखंडामधील एक विशेष पदार्थ आहे. या गुटख्यामुळे तोंडाचे कॅन्सर हे अगदी कॉमन झालेले आहेत. या तोंडाच्या कॅन्सरचे दुसरे असे वैशिष्ट आहे की, गुटख्यामुळे जे कॅन्सर होतात ते साधारण तरुण मंडळींमध्ये म्हणजे ३० ते ४० वय वर्षे वयोगटात याचे प्रमाण जास्त आहे. या वयोगटातील मंडळींना जेव्हा कॅन्सर होतो तेव्हा किती मोठे नुकसान होते ते आपण पाहताच आहोत. दारूमुळे देखील अनेक प्रकारचे कॅन्सर होतात.

दुसरी गोष्ट म्हणजे आपण काय खातो आणि काय पितो याच्यामुळे देखील कॅन्सर होतो. अतिलठ्ठपणा किंवा ओबेसिटी हे सुद्धा कॅन्सरशी संबंधित आहेत. अनेक प्रकारचे कॅन्सर जसे स्तनांचा कॅन्सर, मोठ्या आतड्यांचा कॅन्सर, गर्भाशयाचा कँन्सर हा सुद्धा अतिलठ्ठपणाशी संबंधित आहे. सामान्यपणे असे समजले जाते की एक ब्रिटिश स्टडी झाला होता की ज्याच्यामध्ये असं आढळून आलं की, ६० टक्के कॅन्सर हे जीवनशैलीशी निगडित आहेत.

कॅन्सरची जी लक्षणं असतात ती आपल्याला पटकन आढळत नाहीत. कारण बऱ्याचवेळा सुरुवातीला अतिशय साधी लक्षणे असतात. एक कॉशन (CAUTION) नावाचे निमोनिक आहे ज्याच्यामध्ये आपल्याला समजू शकत की कॅन्सरची कोणती लक्षणे असू शकतात. त्याचा प्रत्येक शब्द हा लक्षणाशी संबंधित आहे. C for change in bowel or bladder habits म्हणजे आपल्या शौचाच्या नियमावलीमध्ये काही बदल झाले रक्त जायला लागलं किंवा २-३ दिवस शौचाला होत नसेल किंवा खूप डायरिया होत असेल तर मात्र डॉक्टरांकडून तपासणी करून घेणे गरजेचे आहे, A for a sore that does not heal म्हणजे कुठेही जखम झाली आहे ती भरतच नाहीये तर तिथे मलम लावून झाली उपचार झाले तरीही भरत नाहीये तर मग तपासणी करून घ्यावी., U for unusual bleeding or discharge म्हणजे मेनोपॉज होऊन १० वर्ष होऊन गेली आहेत तरी अचानक ब्लिडींग झालं तर मग तपासणी करावी., T for thickening or lump in the breast or elsewhere म्हणजे कोठेही गाठ झाली ती दुखत नाही खुपत नाही तरी सुद्धा ती गाठ हळूहळू वाढतीये तर मग निश्चितपणे डॉक्टरांकडून तपासणी करून घ्यावी. हे लक्षात ठेवणे गरजेचे आहे की, कोठेही गाठ झाली तरी दुखायला हवं. लाली यायला हवी. ठणकायला हवं. तसं होत नाही कॅन्सरमध्ये फक्त गाठ असते आणि ती इतकी सामान्य वाटते पण ती गाठ कॅन्सरची असू शकते. त्यामुळे तिची तपासणी करून घेणं गरजेचं आहे., I for indigestion म्हणजे जर आपल्याला गिळायला त्रास होत असेल किंवा घासागणिक पाणी पिण्याची गरज भासत असेल तर मग तपासणीची गरज आहे., O for obvious change to warts or moles म्हणजे आपल्याकडे जी जन्मखूण असते त्यात जर अचानकपणे काही बदल झाले तर तपासणी करून घेणे गरजेचे आहे., आणि N for nagging cough and horsness म्हणजे जर खोकला जातच असेल तर तपासणी करून घेणे गरजेचे आहे.

# विरार-अलिबाग कॉरिडॉर: पहिल्या टप्प्यासाठी लवकरच निविदा

**मुंबई :** विरार-अलिबाग बहुउद्देशीय मार्गिका हा प्रकल्प बीओटी तत्वानुसार राबविण्यासाठी व्यवहार्यता अभ्यासाचा प्रस्ताव एमएमआरडीसीने 15 दिवसांपूर्वी राज्य सरकारकडे सादर केला आहे. या प्रस्तावाला मान्यता मिळाल्यानंतर बहुउद्देशीय मार्गिकेतील नवघर-बलवली या पहिल्या टप्प्याच्या कामासाठी बीओटी तत्वावर निविदा काढण्यात येणार आहेत.



एमएसआरडीसी 126 किमी लांबीची विरार-अलिबाग बहुउद्देशीय मार्गिका बांधणार आहे. हा प्रकल्प हाती घेऊन कित्येक वर्षे झाली तरी प्रत्यक्षात तो मार्गी लागलेला नाही. एमएसआरडीसीने या मार्गिकेतील नवघर-बलवली या पहिल्या टप्प्यासाठी निविदा प्रक्रिया राबववूत कामाला सुरुवात करण्याची तयारी सुरु केली होती. मात्र हे कामही आता लांबणीवर पडले आहे. पहिल्या टप्प्यासाठी काढण्यात आलेल्या निविदा काही महिन्यांपूर्वी रद्द करण्यात आल्या आहेत. पहिल्या टप्प्यात 11 पॅकेजमध्ये मागविण्यात आलेल्या निविदेला चांगला प्रतिसाद मिळाला होता. यासाठी 33 निविदा सादर झाल्या होत्या. मात्र या निविदा 36 टक्के अधिक दराने सादर झाल्या होत्या आणि त्यामुळे प्रकल्पाच्या बांधकाम खर्चात प्रचंड वाढ झाली होती. प्रकल्पासाठी इतका निधी उपलब्ध करणे शक्य नसल्याचा मुद्दा उपस्थित करीत एमएसआरडीसीने बीओटी तत्वावर निविदा राबविण्याचा निर्णय घेतला. (पान ४ वर...)



# आनंदी जीवनाची परिक्रमा

## मैत्र-वाचनाचे

अस्मिता प्रदीप येंडे





माणसाला आनंद नेमका कशामुळे होतो? व्यक्तिपरत्वे याची कारणे वेगवेगळी असू शकतात. दुःख आपोआप होते, त्यासाठी काही करावे लागत नाही. पण आनंद हा शोधावा लागतो. जे आहे त्यात आनंद मानणे ही एकप्रकारे साधना आहे. नैराश्य, ताण जागोजागी पेरलेले आहे. आनंदाची बीजे शोधणं ही खरी कला आहे. आपल्या आसपासचे वातावरण सध्या अनेक दुविधांनी व्यापलेले आहे. मूलभूत गरजा, नोकरीची चिंता, फसवणूक, अन्याय, व्यभिचार, प्रेमभंग, आत्महत्या, खून या सगळ्या घटना मोठ्या प्रमाणावर घडत आहेत. सकारात्मकता गेली कुठे? असा प्रश्न पडू लागला आहे.

कोणाला छोट्या गोष्टीतही आनंदी राहता येते, काहींना आनंद होण्यासाठी काही मोठी घटना घडावी असे वाटते.

आपल्या आनंदी असण्यात मेंदूची काय भूमिका असते, असा विचार कधी केलाय का? मानवी शरीराचे उत्तम व्यवस्थापन करण्याचे काम मेंदू करतो. आपण फक्त बाह्य रूपाकडे लक्ष देतो पण, शरीरातील हे महत्त्वपूर्ण अवयव सुदृढ असतील तर जीवन नक्कीच आनंदी होईल नाही का!


माय मिरर पब्लिशिंग हाऊस प्रकाशित आणि न्यूयॉर्क टाइम्सचे बेस्ट सेलिंग लेखक डॉ. डॅनियल आमेन, एमडी यांचे 'यू हॅपियर' हे पुस्तक आपल्या मेंदूच्या प्रकारावर आधारित आनंदी राहण्यासाठी न्यूरोसायन्स मधील ७ रहस्ये कोणती, यावर महत्त्वपूर्ण माहिती देते. मूळ पुस्तक इंग्रजी भाषेत असून या पुस्तकाचा मराठी अनुवाद लेखिका वीणा रारावीकर यांनी अगदी सहजरित्या, वाचकाला समजेल अशा स्वरूपात केला आहे. या अनुवादामुळे असे संशोधनपर विषय आणि मानवी जीवनातील मर्म यांची अधिक माहिती जाणून घेणे सोपे होते. डॉ. आमेन यांनी १५५ देशामधील २ लाख पेक्षाही जास्त मेंदूच्या स्कॅनचा अभ्यास करून संशोधन केले, त्यातील विविध मेंदूची रचना, त्यांची वयपरत्वे तुलना करून त्यांना जी ७ रहस्ये उमगली, त्याची अभ्यासपूर्ण माहिती या पुस्तकात दिलेली आहे.

या पुस्तकात ३० दिवसांमध्ये एखादी व्यक्ती स्वतःमध्ये कसा बदल घडवू शकते, यासाठी काही गृहपाठ दिलेला आहे. हे पुस्तक वाचणे म्हणजे आपल्या आनंदी असण्याकडे पुढे टाकलेले एक पाऊल ठरेल. आपल्या मेंदूचा आकार, त्याची रचना याचा आपण कधी विचार केला नाही पण या पुस्तकात मेंदू हाच केंद्रस्थानी आहे.

'जर मेंदू निरोगी असेल तर आयुष्य आनंदाने जगता येऊ शकतं' हे वाक्य आपल्याला विचार करायला प्रवृत्त करते. या पुस्तकात एकूण १६ प्रकरणे असून, प्रत्येक प्रकरण अगदी विस्तृतपणे मांडलेले आहे.

या पुस्तकात मेंदूचे विविध प्रकार, मेंदूची अंतर्बाह्य रचना, त्यातील कार्यप्रणाली सोबत आपला मेंदू यातील कोणत्या प्रकारात मोडतो, हे जाणून घेण्यास सांगितले आहे. कारण मेंदूचे कार्य आपल्या संपूर्ण जैविक कार्यप्रणालीवर परिणाम करत असते, त्यामुळे तो निरोगी असणे किती गरजेचे आहे, ते या पुस्तकामुळे अधोरेखित होते.

शरीराचे जीवशास्त्र असते पण आनंदाचे जीवशास्त्र असते? आपल्या शरीरात कोणती संप्रेरके स्त्रवतात, कोणती संप्रेरके आनंद निर्माण करतात, याची माहिती मिळते. जीवनात सकारात्मक दृष्टीकोन निर्माण करण्यासाठी मन आनंदी असणे आवश्यक आहे. मेंदूची कार्यक्षमता अधिक वाढवण्यासाठी, आपल्या मेंदूसाठी काय चांगलं आणि काय वाईट? हे कसे बरे कळेल. त्यासाठी हे पुस्तक वाचणं आणि यात दिलेल्या स्वाध्यायानुरूप जर आपण




कार्य केले तर नक्कीच सकारात्मक उत्तर मिळेल.

जे ताणयुक्त वातावरणात वावरतात, सतत अतिविचार करतात, त्यांनी या परिस्थितीशी दोन हात करण्यासाठी मेंदूला कसे सक्षम बनवावे, यासाठी नेमकी कोणती कौशल्ये वापरावीत, याची माहिती अत्यंत सोप्या शब्दात मांडली आहे. मेंदूच्या प्रभावी कार्यक्षमतेसाठी फक्त मानसिक साधना करणं पुरेसे नाही तर प्रफुल्लित वातावरण, पोषक आहार, व्यायाम, योगासने, ध्यानधारणा या घटकांचीही जोड द्यावी लागते. कोणत्या गोष्टीमुळे आपल्याला आनंद होतो, हे शोधून काढणे आणि त्याची नोंद करणे, अशाप्रकारे आनंदी राहण्याची प्रक्रिया सुरू होते.

निरोगी मेंदूसाठी इतर अनेक घटक आहेत, ज्याचा आपल्या जीवनावर परिणाम होत असतो, ज्यावर कधीही चर्चा केली जात नाही. शारीरिक व्याधी, अपुरी झोप, ताणयुक्त जीवन यामुळे मेंदूची रचना कशी बदलत जाते, याचे उदाहरण समजून घेण्यासाठी या पुस्तकात विविध वयोगटातील व्यक्तींचे मेंदूचे स्कॅन दिलेले आहेत. त्यानुसार मेंदूतील कमी कार्यरत भाग कसा दिसतो, निरोगी आणि आनंदी मेंदू कसा दिसतो, यातील तुलनात्मक अभ्यास करून संकल्पना मांडलेली आहे.

आपल्या शरीरातील पोषक घटक नष्ट झाल्याने सुद्धा दुःख निर्माण होऊ शकते. आपण घेत असलेली औषधे आपल्या दुःखाचे कारण होऊ शकते का? यावरही चिंतन होणं आवश्यक आहे. आपण कोणते पदार्थ खातो, आपल्या आहारात आपण कोणत्या गोष्टींचा समावेश केला आहे, यावरही आपल्या अनेकविध भावनांची पातळी अवलंबून असते. मनाला समाधान मिळवून देणारे अन्नपदार्थ कोणते, शरीराला घातक ठरणारे पदार्थ कोणते, कोणते अन्न आपल्याला आनंदी करते, याची संपूर्ण यादी सोबत ते पदार्थ आपल्या शरीरावर कसे परिणाम करते, कोणत्या अन्नपदार्थांचे सेवन केले पाहिजे, यावर सविस्तर विवेचन केलेले आहे.

कोणते घटक आपल्या आनंदाला मारक ठरतात, त्याचा आपल्या मेंदूवर कसा परिणाम होतो, मेंदू निरोगी राहण्यासाठी कोणते प्रयत्न केले पाहिजेत, आपले उद्दिष्ट कसे ठरवावे, मानवी भावनांना कसे नियंत्रित करावे, माणसाच्या अपेक्षा, उच्चतम आकांक्षा माणसाला कसे निराशेच्या गर्तेत ओढतात, यावर भाष्य करून माणसाने स्वतःचं व्यक्तिमत्त्व अधिक प्रभावी करण्यासाठी हे पुस्तक नक्की वाचावे.

आनंदी राहणे हा माणसाच्या रोजच्या जीवनातील अविभाज्य घटक आहे. न्यूरोसायन्समधील काही सुचविलेली पद्धती, काही सवयी तुमचा मार्ग अधिक सुकर करतील, याची खात्री वाटते. या पुस्तकाच्या अनुवादक वीणा रारावीकर यांनी अनुवाद करताना मूळ लेखकाच्या संकल्पनेला कुठेही धक्का न लावता हा महत्त्वपूर्ण विषय अशाप्रकारे वाचकांपर्यंत आणला, त्याबद्दल धन्यवाद!

**(यू हॅपियर / मूळ लेखक : डॉ. डॅनियल आमेन / मराठी अनुवाद : वीणा रारावीकर / प्रकाशक : माय मिरर पब्लिकेशन हाऊस / मूल्य : ३९९ रुपये )**

# पराग लोणकर

## खिडकी





किरण आचार्य
72194 20001

लिखाणाचा किडा तसा लहानपणापासूनच माझ्या अंगात होता. चंपक, चांदोबा, त्यावेळी उपलब्ध असलेले कॉमिक्स, या सर्व पुस्तकात कधीतरी आपण लिहिलेले साहित्य असावे असे खूप वाटायचे. त्यावेळी काही कल्पना मी लिहिल्याही होत्या. मात्र त्या तेव्हाच्या वयाला आणि विचारांना अनुसरून होत्या, अर्थात सर्वार्थाने अपरिपक्व अशाच होत्या.

इंडियन एक्सप्रेसने मला पहिली संधी दिली. त्यांच्या लोकप्रभामध्ये माझा पहिला लेख प्रकाशित झाला. मुळात मला ऑटोमोबाईल या विषयावर लिखाण करायचे होते. मी जवळपास शंभर-एक पानांचे लिखाण देखील केले होते. मात्र ते लिखाण कोणीही प्रसिद्ध करायला तयार नव्हते. लोकप्रभामध्ये देखील वाहन विषयक सदर सुरू करण्यासाठी मी प्रयत्न करत होतो. मात्र माझा एक शैक्षणिक लेख त्यांनी प्रसिद्ध केला. त्यानंतर मला संधी मिळाली ती महाराष्ट्र टाइम्समध्ये. सलग तीन वर्ष दर गुरुवारी माझे ऑटोमोबाईल विषयक सदर त्यात प्रसिद्ध झाले आणि आपण बऱ्यापैकी लिहू शकतो हे माझ्या लक्षात आले. मात्र हे आतापर्यंतचे लिखाण म्हणजे केवळ माहिती देणारे लिखाण होते. असे साहित्य वगैरे या साच्यात ते बसणारे नव्हते. दरम्यान मोहिनीराज प्रकाशन तर्फे एक राज्यस्तरीय कथा स्पर्धा आयोजित करण्यात आली होती आणि त्यात मी पहिल्यांदा एक कथा पाठवली. अनपेक्षित त्या कथेला प्रथम क्रमांक प्राप्त झाला व त्यांच्या एका विशेष कथासंग्रहात या कथेचा समावेश झाला. ज्याचे प्रकाशन बाबासाहेब पुरंदरे यांच्या हस्ते झाले. माझ्यासाठी ही दुनियाच नवी होती. साहित्य क्षेत्र मला फक्त ऐकून माहित होतं. मात्र प्रत्यक्ष असे सगळे मी कधीही अनुभवले नव्हते. ही नावाजलेली मंडळी प्रत्यक्ष बघणे आणि त्यांना ऐकणे, हे सर्वच माझ्यासाठी नवीन होते.

यानंतर मी दिवाळी अंकांकडे मोर्चा वळवला. येथे देखील प्रवास सोपा नव्हता. मी पाठवलेली कथा दिवाळी अंकात आहे की नाही? हे देखील मला कळवण्याची तसदी कुणी घेत नव्हते. प्रस्थापितांमध्ये मला नेमका शिरकाव कसा करावा हे समजत नव्हते आणि अचानक एक दिवस मला कलामंच या हिमांगी नेरकर यांच्या दिवाळी अंकात माझ्या कथेची निवड झाल्याचा मेसेज आला. एका नवीन साहित्यिक विश्वात मी त्यांच्या माध्यमातून दाखल झालो. चिं. त्र्यं. खानोलकर उर्फ आरती प्रभू यांच्या कन्या म्हणजे सौ. हेमांगी नेरकर. यांचा मानाचा कलामंच हा दिवाळी अंक. या अंकासाठी पुढे मी बरीच वर्षे लिखाण केले. कलामंचमुळे साहित्य क्षेत्राचे दरवाजे माझ्यासाठी उघडले. मात्र तरीही मी अजून तसा नवखा होतो. कारण मी जरी शैक्षणिक क्षेत्रात असलो तरी, माझी पार्श्वभूमी शैक्षणिक आणि साहित्यिक नव्हती. तरीही मला माझ्या दिवाळी अंकातील प्रसिद्ध कथा एकत्र करून एक पुस्तक करण्याची इच्छा होती. प्रश्न होता तो हा, की हे पुस्तक प्रकाशित कोण करणार?

माझ्या परिचयातील, परिचयातील म्हणण्यापेक्षा नात्यातील एक दोघे प्रकाशकांकडे पुण्याला कामाला होते. मी त्यांच्याशी थोडी चर्चा केली आणि अपेक्षेप्रमाणे त्यांनी हल्ली कोणी प्रकाशक नवीन लेखकांची पुस्तके करतच नाही वगैरे वगैरेची नकारघंटा वाजवली. एकाने तर चांगले सहा महिने माझे लिखाण स्वतःकडे ठेवले व नंतर ते अयोग्य असल्याचे सांगून परत केले. एकंदरीत साहित्याच्या मुख्य प्रवाहात येणे हे माझ्यासाठी कठीण बनत होते आणि अशा परिस्थितीत महाराजांच्या कृपेने अचानक अशी एक व्यक्ती माझ्या आयुष्यात आली, ज्याने मला अगदी अलगद या साहित्य क्षेत्रात व्यवस्थित सामावून घेतले.

पराग लोणकर, मधुश्री प्रकाशनाचे सर्वेसर्वा. पुण्यातील साहित्य क्षेत्रात त्यांच्या वडिलांपासून ही प्रकाशन संस्था कार्यरत आहे. साहित्याचा प्रगल्भ वारसा यांना लाभलेला आहे आणि साहित्य क्षेत्रातील दिग्गज मंडळींसोबत हे स्वतः काम करतात. अपघातानेच त्यांच्याशी माझा संपर्क झाला आणि त्यांनी माझे लिखाण मागवले. साधारण आठच दिवसात माझ्या कथांचे पुस्तक होऊ शकते आणि ते मधुश्री प्रकाशन मार्फत प्रकाशित देखील होऊ शकते हे त्यांनी मला कळवले. आजही तो दिवस आणि ते क्षण मला आठवतात.

त्यांच्याशी फोनवर बोलतानाच लक्षात आले की ही व्यक्ती वेगळ्याच उंचीची आहे. अतिशय मृदू भाषा आणि सोज्वळ संवाद, ही त्यांची खास वैशिष्ट्ये या कॉलवरील संवादात मला जाणवली. दरम्यान पुस्तक फायनल करण्याआधी त्यांनी मला प्रत्यक्ष भेटीकरता बोलावले. त्यांची पहिली भेट ही खूप खास होती. पुस्तक निर्मिती प्रक्रिया नेमकी कशी असते हे त्यांनी मला खूप छान पद्धतीने समजावून दिले. मी मूळ विदर्भातील, मात्र लहानपण, शिक्षण आणि बाकी ज्याला हल्ली करिअर म्हणतात हे सर्व मुंबईत झालेले. यादरम्यान पुणे आणि साहित्य याबद्दल मी बरेच ऐकून होतो. जे कोणी थोडेबहुत लिखाण करणारे माझ्या परिचयात होते, ते नेहमी सांगायचे की, विदर्भातील लेखकांची पुस्तके पुण्यातील प्रकाशनात घेत नाहीत. पुण्याचे प्रकाशक म्हणजे एक वेगळीच उंची, प्रतिष्ठा, असे बरेच काही मी ऐकून होतो. तसाच काहीसा अनुभव मी पराग लोणकर यांना भेटण्याआधी घेतलाही होता. मात्र प्रत्यक्ष मूळ पुण्यात आणि साहित्यात लहानाचे मोठे झालेले पराग लोणकर मला भेटले आणि खरी वैचारिक श्रीमंती कशी असते याचा प्रत्यक्ष अनुभव मला आला.

साहित्य क्षेत्रात तसा मी नवखा असल्याचे जेव्हा त्यांना समजले, त्यांनी अगदी व्यवस्थित मला ही प्रक्रिया सांगितली. 'ती.. तो.. आणि मी..!' हा माझा पहिला कथासंग्रह त्यांच्या प्रतिष्ठित मधुश्री प्रकाशनतर्फे प्रकाशित झाला आणि माझा साहित्य प्रवास सुरू झाला. पुस्तक निर्मिती प्रक्रियेत पराग लोणकर हे स्वतः जातीने लक्ष घालतात. मग ते वाचन असो, टायपिंग असो, प्रूफ रीडिंग असो किंवा मुखपृष्ठ आणि इतर बारीक-सारीक बाबी असोत. साहित्यावर आणि पुस्तकांवर नितांत प्रेम करणारे पराग लोणकर हे माझ्या मनाला खूप भावले. त्यांच्याशी बोलणे हे खूप समाधान आणि आनंद देणारे असते. त्यांच्या संस्कारात घडलेल्या माझ्या पहिल्याच कथासंग्रहासाठी मला 'पद्मश्री रणजीत देसाई युवा साहित्यिक पुरस्कार' प्राप्त झाला. आणि नंतर एका मागोमाग एक पुरस्कार आणि सन्मानांची रांगच लागली.

आज केवळ त्यांच्यामुळेच मी साहित्य क्षेत्राच्या मुख्य प्रवाहात छोटीशी का होईना पण माझी ओळख निर्माण करू शकलो. ते आज कुठे माझा परिचय करून देताना माझे मित्र म्हणून माझी ओळख करून देतात. हा मला माझा बहुमान वाटतो. कदाचित ही अतिशयोक्ती वाटेल मात्र या माझ्या सर्व भावना अगदी मनापासून आहेत. त्यांनीच सुचवलेला एक विषय होता कुटुंबाबाबत. ज्यावर 'विभक्त कुटुंब पद्धती, परिस्थिती, कारणे आणि उपाय.' हे पुस्तक आम्ही केले. एका वेगळ्या सामाजिक विषयावर लिहिण्याची ही माझी पहिलीच वेळ होती. मात्र मी असे लिखाण करू शकतो हा विश्वास पराग लोणकरांना होता. त्यामुळे मी केवळ कथांमध्ये अडकून न पडता चौफेर लिखाणाला सुरुवात केली.

माझे स्वतःचे पुस्तक हे जे स्वप्न मी बघितले होते ते पराग लोणकरांमुळे सत्यात उतरले. व त्याचबरोबर साहित्य क्षेत्रात नेमके काय, कसे, कुठे, काम करावे याचे धडे देखील मला लोणकरांनी दिले. त्यामुळे माझा एका पुस्तकापासून सुरू झालेला हा साहित्य प्रवास आज सात ते आठ पुस्तके आणि त्याचबरोबर 'अखिल भारतीय मराठी प्रकाशक संघाच्या' कार्यकारणी सदस्यत्वापर्यंत जाऊन पोहोचला. ज्या माध्यमातून साहित्य क्षेत्रातील दिग्गज व्यक्तींचा थेट सहवास मला लाभला. हे केवळ पराग लोणकर यांच्यामुळे शक्य झाले.

# आठवणी

## फेरे लग्नाचे भाग ४३



संध्या सिनकर
sandhya22218@yahoo.in

**विनय**

आज माझ्या पत्नीचा, सरिताचा चौथा मृत्यू दिन. सरिताच्या खूप आठवणी दाटून आल्या आहेत. मला आमच्या लग्नातली सरिता आठवते. भांबावलेली, थोडी घाबरलेली, जरीच्या साड्या, दागिने घालून लाजऱ्या डोळ्यांनी हळूच बघणारी. सरिता आमच्या गावाकडची आईची लांबची नातेवाईक. मी आई-वडिलांचा एकुलता एक मुलगा. आम्ही मुंबईत राहत असलो तरी आई-बाबांचे बहुतेक सगळे नातेवाईक जळगाव व बाजूच्या गावात आहेत. आमचे औषधांचे मोठे दुकान आहे व इतरही काही व्यवसाय आहेत. आमची सांपत्तिक स्थिती अतिशय चांगली. पण आधुनिक मुलीपेक्षा घराला बांधून ठेवेल, सगळ्यांना प्रेम लावेल अशी गावाकडची मुलगी मला आवडेल तसं मी आई बाबांना सांगितलं होतं. मी सरिताला एका लग्नात पाहिले. खूप छान दिसत होती. सुंदर, निरागस. मैत्रिणी समवेत हसत, बोलत, बागडत होती. मला आवडली. आमचं लग्न झालं तेव्हा ती अठरा वर्षाची होती व मी पंचवीस वर्षाचा.



सरिता आमच्या घरात लगेच मिसळून गेली. ती समजूतदार, समाधानी व आनंदी होती. सुगरण होती. सरिताने लग्नानंतर मला एकदा विचारले, "तुम्ही एवढे शिकलेले, श्रीमंत. तुम्ही मला कशी काय पसंत केलीत."

मी तिला म्हणालो, "मी तुला लग्नात बघितलं. आईने मला दाखवले, ती कमू मामीची मुलगी बघ. पिस्ता कलरच्या साडीमधली. मी तुझ्याकडे बघितलं तेव्हा तू मैत्रिणींबरोबर खळखळून हसत होतीस. तुझा सगळा चेहरा उजळला होता. तू सुंदर तर आहेस. तुझा लांब शेपटा. तू खूप आवडलीस, मी लगेच आईला सांगितलं मला मुलगी आवडली." मी तिला विचारलं, "तू काय विचार केलास माझ्याशी लग्न करताना." ती म्हणाली, "मला मुंबईचा मुलगा नको होता. मी आईला सांगितलं मला जळगाव किंवा जवळपासचा मुलगा बघा. मला तुमच्यापासून फार लांब जायचं नाही. मी मुंबईत भांबावून जाईन. त्यामुळे तू आधीच त्यांना नाही म्हणून सांग." आई म्हणाली, "ते आपल्या नात्यातले, माहितीतले आहेत. मुलगा, कुटुंब चांगले आहे. मुलगा चांगला शिकलेला आहे. सुसंस्कारी आहे. ते उद्या आपल्या घरी येणार आहेत. तू त्यांना भेट. त्यानंतरही तुला वाटले की तुला मुंबईला जायचं नाही तर आपण त्यांना नाही म्हणून सांगू. त्यामुळे मी निश्चिंत झाले. आणि नाही सांगायचं ठरवून टाकले. तुम्ही आलात व सगळ्यांच्या गप्पा सुरू झाल्या. तुम्ही सगळ्यांचे बोलणे लक्षपूर्वक ऐकत होतात व मोजकच बोलत होता. तुम्ही येणार म्हणून आईने मुद्दाम बनवलेले सगळे पदार्थ तुम्हाला आवडले. तुम्ही त्याचं कौतुक केलं. तुम्ही ते परत घेऊन खाल्ले. तुमचं मोकळं व सौजन्यपूर्ण वागणं मला आवडले. आई-बाबाही आवडले. तुम्ही त्याच भेटीत आम्हाला मुलगी पसंत आहे. पण तुम्ही मुलीशी नीट बोलून मग आम्हाला कळवा असं सांगितलं, तेही आवडलं. या सगळ्यांमध्ये मी माझा मुंबई विरोध विसरून गेले. आपले लग्न झाले. आपले सूर जुळले. माझा निर्णय योग्य ठरला."

बारावी झाल्यावर, सरिताचे लग्न झाले. त्यामुळे तिने पुढे शिकावं. पदवी घ्यावी असं मला वाटत होतं. पण तिला शिक्षणाची आवड नव्हती. त्यामुळे मी माझा आग्रह सोडून दिला.

दीपाचा, आमच्या मोठ्या मुलीचा जन्म झाला. घरात आनंद पसरला. मुंबईत जास्त चांगली हॉस्पिटल व डॉक्टर आहेत म्हणून आईने सरिताचे बाळंतपण मुंबईत करायचे ठरवले. दीपा महिन्याची झाल्यावर, सरिता महिनाभर माहेरी राहून आली. सरिता आमच्या घरी रमून गेली. तिचं व आईचं खूप जमत असे. माझ्यापेक्षाही आई, तिला मनातल्या सगळ्या गोष्टी सांगते. सरिताची आईही कधीकधी म्हणते लग्न झाल्यावर ती आम्हाला विसरली.

दीपानंतर सहा वर्षांनी चंदाचा जन्म झाला. सरिताने दोघींचेही संगोपन केले. त्यांची आजारपणं काढली, त्यांच्यावर चांगले संस्कार केले. दीपा इंजिनिअरिंग करतानाच तिच्या वर्गातल्या विकासच्या प्रेमात पडली. त्यांची भाषा वेगळी. कुटुंब कनिष्ठ मध्यमवर्गीय. त्यामुळे मुलगा चांगला असला तरी आम्हाला दोघांनाही हे लग्न फारसं पसंत नव्हते. सरिताने तिला मुलावरच्या जबाबदाऱ्या, अशा कुटुंबात, एकत्र परिवारात सुनेकडून त्यांच्या असलेल्या अपेक्षा याची जाणीव करून दिली. पण दीपा तिच्या निर्णयावर ठाम राहिली. तिने विकासशी लग्न केल्यावर, सरिताने आपलं मत बाजूला ठेवून तिला मानसिक आधार दिला. लग्न झाल्यावर सुरुवातीच्या वर्षात तिला खूप चढ-उतारांचा सामना करावा लागला. त्यावेळी सरिता कायम तिच्या पाठीशी उभी राहिली. आज तिची गाडी सुसाट धावते आहे.

स्वरा ही दीपाची मुलगी. आता साडेपाच वर्षाची होईल. तिच्यावर सगळ्यांचं खूप प्रेम. स्वरा, जेमतेम वर्षाची झाली असेल तेव्हा माझे आई-वडील थोड्याशा आजाराने एकापाठोपाठ गेले. त्यातून मी सावरण्याचा प्रयत्न करत असताना सरिता आजारी पडली. तिचा आजार गंभीर होता. तिच्या आजाराने माझं भावविश्व कोलमडलं. तिची तब्येत झपाट्याने खालावली. तिला उठताना, चालताना आधार लागू लागला. ते पाहून माझ्या डोळ्यात पाणी येई. अवघ्या पंचावन्नव्या वर्षी ती इतकी आजारी पडावी. तिची देखभाल करण्यासाठी मी एक नर्स ठेवली. तेव्हा चंदा आर्किटेक्ट झाली होती. ती स्वतःचा इंटेरियर डेकोरेटर्स व्यवसाय सुरू करण्याची तयारी करत होती. तिने आईची सेवा करावी व तिच्याबरोबर राहावे म्हणून तिचा व्यवसाय करायचा विचार पुढे ढकलला. सरिताचे आजारपण वर्षभर चालले. त्या सर्व काळात तिला माझ्यापेक्षा जास्त आधार चंदाने दिला. मीही माझ्या व्यवसायातले लक्ष कमी करून सरिताबरोबर जास्त वेळ घालवत होतो. पण आमच्या प्रयत्नांना न जुमानता, वयाच्या अवघ्या छपन्नाव्या वर्षी सरिता आम्हाला सोडून गेली. पण तिच्या असंख्य आठवणी आमच्या सोबत आहेत.

चंदा आता तिच्या व्यवसायात स्थिरावली आहे. तिने तिच्या व्यवसायातील भागीदार अशोक सोबत लग्न केले. आता दोन्ही मुली सुखात आहेत. सरिताच्या आई-बाबांच्या असंख्य आठवणींसोबत माझे मार्गक्रमण चालू आहे.

# डॉक्टर-होमिओपॅथी (Doctor–BHMS)



प्रसन्न हर्डीकर | आनंद वामनसे

**करिअर बावनी**
**लेख-४३**

**तुमचे करियरविषयी प्रश्न तुम्ही ileadcareercoCach@gmail.comला पाठवू शकता.**

वैद्यकीय क्षेत्रात केवळ ॲलोपॅथीच नाही, तर उपचाराच्या अनेक प्रभावी पद्धती उपलब्ध आहेत. त्यापैकीच एक म्हणजे होमिओपॅथी. 'होमिओपॅथी' हा एक उपचार पद्धतीचा प्रकार असून, 'समानता उपचाराचे' (Like Cures Like) या तत्त्वावर आधारित आहे. 'बीएचएमएस' (Bachelor of Homeopathic Medicine and Surgery) हा होमिओपॅथिक डॉक्टर बनण्यासाठीचा अभ्यासक्रम आहे. ज्यांना रुग्णांना नैसर्गिक आणि सौम्य पद्धतीने बरे करण्यात रस आहे, ज्यांना मानवी शरीराला समग्रपणे (Holistically) समजून घेऊन उपचार करायचे आहेत, त्यांच्यासाठी होमिओपॅथीमध्ये करिअर करणे हा एक उत्तम पर्याय आहे.

**पात्रता (Eligibility)**

- बारावी (XII) विज्ञान शाखेतून भौतिकशास्त्र (Physics), रसायनशास्त्र (Chemistry) आणि जीवशास्त्र (Biology) विषयांसह किमान ५०% गुण आवश्यक.
- प्रवेश परीक्षा: NEET (National Eligibility cum Entrance Test) उत्तीर्ण करणे बंधनकारक आहे.
- वयोमर्यादा: १७ वर्षांपेक्षा जास्त वय आवश्यक.

**अभ्यासक्रमाचा कालावधी (Duration of the Course)**

BHMS (Bachelor of Homeopathic Medicine and Surgery) हा ५.५ वर्षांचा अभ्यासक्रम असतो — त्यात ४.५ वर्षांचे अकादमिक शिक्षण आणि १ वर्षाची अनिवार्य इंटर्नशिप समाविष्ट असते.

**महत्त्वाचे विषय (Important Subjects)**

- Anatomy
- Physiology
- Homeopathic Pharmacy
- Materia Medica
- Organon of Medicine
- Pathology & Microbiology
- Community Medicine
- Surgery & Obstetrics
- Repertory (रोग व औषधसंदर्भ तक्ता अभ्यास)

**प्रशिक्षण कालावधी (Internship Period)**

- अंतिम वर्षानंतर विद्यार्थ्यांना १ वर्षाची रुग्णालयीन इंटर्नशिप करावी लागते.
- यात रुग्णांचे निदान, औषधनिर्धारण, आणि केस स्टडींचा प्रत्यक्ष अनुभव दिला जातो.

**काठिण्य पातळी (Difficulty Level)**

- मध्यम ते कठीण.
- वैद्यकीय ज्ञानाबरोबर रुग्णांच्या मानसिक आणि भावनिक स्थितीचा अभ्यास करण्याची क्षमता आवश्यक.
- सतत अध्ययन, निरीक्षण आणि संवाद कौशल्य गरजेचे.

**नोकरीच्या संधी (Job Opportunities)**

**BHMS पदवीधरांना खालील क्षेत्रांमध्ये संधी मिळू शकते:**

- सरकारी आणि खाजगी होमिओपॅथिक रुग्णालये
- वैयक्तिक क्लिनिक / स्वतंत्र प्रॅक्टिस
- वैद्यकीय अधिकारी – आरोग्य विभाग
- संशोधन संस्था
- फार्मास्युटिकल कंपन्या



- शिक्षणतज्ज्ञ (Lecturer / Professor)
- वेलनेस सेंटर्स आणि समग्र उपचार केंद्रे

**सरासरी प्रारंभिक पगार (Average Starting Salary)**

बीएचएमएस झाल्यानंतर प्रारंभिक पगार साधारणपणे वार्षिक ₹3 लाख ते ₹6 लाख पर्यंत असतो. अनुभवानुसार आणि प्रॅक्टिसच्या स्थानानुसार हा पगार वाढत जातो. स्वतःची यशस्वी प्रॅक्टिस करणाऱ्या डॉक्टरांसाठी किंवा उच्च शिक्षण घेऊन विशेषज्ज्ञ बनलेल्यांसाठी पगार वार्षिक ₹10 लाख ते ₹25 लाख किंवा त्याहूनही अधिक असू शकतो.

**महत्त्वाची कॉलेजेस (Top Colleges)**

- नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ होमिओपॅथी (NIH), कोलकाता
- डॉ. एम. एल. धवळे मेमोरियल इन्स्टिट्यूट, मुंबई
- श्री रामकृष्ण होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज, भोपाल
- नॅशनल होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज, लखनौ
- राजीव गांधी युनिव्हर्सिटी ऑफ हेल्थ सायन्सेस, बेंगळुरू
- सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न कॉलेजेस
- यशवंतराव चव्हाण कॉलेज ऑफ होमिओपॅथी, कोल्हापूर

**अपेक्षित खर्च (Expected Expenses)**

- सरकारी कॉलेज: ₹1 – ₹3 लाख
- खासगी कॉलेज: ₹6 – ₹15 लाख (कोर्सदरम्यान)

**या क्षेत्रातील मान्यवर (Stalwarts in this Career)**

1. **सॅम्युअल हॅनेमन (Samuel Hahnemann - जर्मनी)**
   - मुख्य योगदान: होमिओपॅथीचे जनक, 'ऑर्गानॉन ऑफ मेडिसिन' ग्रंथ आणि 'औषध सिद्धीकरण' (Drug Proving) पद्धत विकसित केली.
2. **जेम्स टायलर केंट (James Tyler Kent - अमेरिका)**
   - मुख्य योगदान: 'केंटचे रेपर्टरी' (Kent's Repertory) आणि 'लेक्चर्स ऑन होमिओपॅथिक मटेरिया मेडिका' या महत्त्वाच्या ग्रंथांचे लेखन.
3. **जॉर्ज विटुलकास (George Vithoulkas - ग्रीस)**
   - मुख्य योगदान: शास्त्रशुद्ध होमिओपॅथीचे पुनरुज्जीवन केले, 'आरोग्याचे स्तर' (Levels of Health) ही संकल्पना मांडली आणि नोबेल पर्याय पुरस्कार (Right Livelihood Award) प्राप्तकर्ता.
4. **डॉ. राजेंद्र शंकरन (Dr. Rajendra Sankaran - भारत)**
   - मुख्य योगदान: 'सेंसेशन मेथड' (Sensation Method) विकसित केली, 'द स्पिरिट ऑफ होमिओपॅथी' हा ग्रंथ लिहिला आणि राज्यानुसार औषध वर्गीकरण मांडले.
5. **डॉ. जे. एच. क्लार्क (Dr. J.H. Clarke - ब्रिटन)**
   - मुख्य योगदान: 'ए डिक्शनरी ऑफ प्रॅक्टिकल मटेरिया मेडिका' हा तीन खंडांचा संदर्भ ग्रंथ लिहिला आणि ब्रिटनमध्ये होमिओपॅथीच्या प्रसारात मोलाचे कार्य केले.

**उच्च शिक्षण व संधी**

- MD (Hom.) – Materia Medica, Organon of Medicine, Practice of Medicine, Repertory.
- Ph.D. / Research – Clinical Research, Pharmacognosy, Drug Development.
- MBA (Hospital Management / Healthcare Management) – व्यवस्थापन क्षेत्रात करिअर वाढीसाठी.


**परदेशातील संधी**

- UK, USA, Canada, Germany, आणि Australia येथे होमिओपॅथीची मागणी विशेषतः वाढत आहे.
- आंतरराष्ट्रीय प्रमाणपत्रांसाठी Council for Homeopathic Certification (CHC) किंवा Faculty of Homeopathy (London) च्या परीक्षा देता येतात.

**अधिक माहितीसाठी**

- Central Council of Homeopathy (CCH) – https://cchindia.com
- Ministry of AYUSH – https://ayush.gov.in
- NEET परीक्षा माहिती – https://exams.nta.ac.in/NEET/

# श्री कनक दुर्गा मंदिर, विजयवाडा



रामकृष्ण विनायक अभ्यंकर
२/४६ भक्तियोग सोसायटी, परांजपेनगर, वझिरा नाका, बोरीवली प., मुंबई
मोबा. ९८१९८४४७१०

**फिरू आनंदे**


आंध्रप्रदेशातील विजयवाडा शहरात रेल्वेस्टेशन पासून रिक्षाच्या किंवा संस्थानच्या बसच्या जेमतेम १० मिनिटाच्या अंतरावरील मध्यवर्ती स्तरावर हिंदूंचे श्री कनक दुर्गा मंदिर हे भक्त/पर्यटकांचे अत्यंत आवडते व श्रद्धेचे स्थळ आहे. स्थापत्यकला, नक्षीकाम, स्थापत्यशास्त्र, नक्षीकाम, कलाकुसर, सौंदर्य इतिहास आदींनी समृद्ध असलेले ठिकाण आहे. या स्थानाला श्री दुर्गा मल्लेश्वर स्वमिवारला देवस्थानम असेही म्हणतात. आंध्र प्रदेशातील हे सर्वात मोठे मंदिर समजले जाते.

**स्वरूप :** हे मंदिर देवस्थान कृष्णा नदीकाठी बनवलेले असून इंद्रकीलाद्री टेकडीवर जमिनीपासून ४०० पायऱ्या उंचावर आहे. मंदिराभोवती सुरेख व प्रशस्त दगडी नक्षीकामयुक्त बांधकामाचा कोट असून दुर्गेचे मधोमध व अत्यंत आकर्षक मंदिर आहे. त्यात प्रवेश घेण्यासाठी परत खाली उतरावे लागते. याच परिसरात कित्येक ऋषी-मुनींनी खडतर तप केले होते. किल नावाच्या भक्ताने देवीची मनोभावे भक्ती केली होती. दुर्गेने कित्येक राक्षसांचा येथे संहार केलेला आहे.

पूजनीय शंकराचार्यांनी या स्थानी चमत्कार घडवलेला आहे. त्याची कथा याप्रमाणे - एकदा एक अत्यंत दरिद्री पण देवभक्त वृद्ध स्त्री समोर येऊन भिक्षा मागू लागली. त्यांना त्या स्त्रीची खूप दया आली. तिची भिक्षा घालायची इच्छा असली तरी अति दारिद्र्याने काही देऊ शकत नसल्याची असमर्थता स्वामींना तिने दर्शवली. ते तिला म्हणाले, "हे बघ तुझ्याकडील गाडगा रिकामा असल्याचे म्हणतेस, नीट हात घालून पाहा आणि मला सांग. त्याचवेळी त्यांनी लक्ष्मीचे स्तवन केले. तिच्याकडे पुण्य साठा नसल्याने काही देण्यास असमर्थता देवीने दाखवली असली तरी तिच्या पुढील जन्मीचे पुण्य म्हणून तरी काही द्रव्य तिच्या पदरी देण्यास सांगितले. "स्वामी, आत मला गाडग्याला खाली एक चिकटलेले पान दिसले. ते स्वीकारा. "गुरूंनी ते स्वीकारताच पान सोन्याचे झाले. त्या स्त्रीला आशीर्वाद देऊन ते पुढे गेले. जगद्गुरूंनी लक्ष्मीची जी स्तुती केली ती पुढे कनकधारा स्तोत्र म्हणून नावारुपास आले, लक्ष्मीच्या श्रीसुक्ता प्रमाणे अजरामर झाले.

**मंदिरातील उत्सव :** मंदिरातील नवरात्रीचा महोत्सव पाहण्यासारखा असतो. त्या दरम्यान लाखो भाविक दर्शनास येतात. त्यामध्ये मनातील संकल्प/मागण्या देवीपुढे मांडून नंतर त्यांच्या पुरत्या भाविक करतात. (नवस बोलणे व नवस पूर्ती ई.)

देवस्थानतर्फे भाविकांसाठी विजयवाडा रेल्वे स्थानक /एस.टी. स्थानक येथून मंदिरापर्यंत जाण्यासाठी नि:शुल्क वाहन सेवा (शेगावप्रमाणे) उपलब्ध केली जाते. त्याचप्रमाणे भाविकांना महाप्रसादाची सेवा उपलब्ध असते.



## थोडक्यात

### किसनराव तारमळे राष्ट्रवादीचे ठाणे जिल्हा ग्रामीण अध्यक्ष

**किन्हवली :** राष्ट्रवादी काँग्रेसचे ठाणे जिल्हा ग्रामीण अध्यक्ष भाऊ गोंधळी यांनी अचानक जिल्हाध्यक्ष पदाचा राजीनामा दिला आहे. त्यामुळे हे पद रिक्त राहिले असल्याने राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश सरचिटणीस किसनराव तारमळे यांच्याकडे राष्ट्रवादी काँग्रेस ठाणे जिल्हा ग्रामीणच्या जिल्हा अध्यक्ष पदाची धुरा देण्यात आली आहे.

आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांसह नगरपालिका निवडणुका लक्षात घेता त्यांच्याकडे हे पद देण्यात आले आहे.

किसनराव तारमळे हे राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते आहेत. ते प्रदेश सरचिटणीस आहेत. राष्ट्रवादीचे अध्यक्ष अजित पवार यांचे ते कट्टर समर्थक आहेत.

आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांमध्ये किसनराव तारमळे यांच्या राजकीय अभ्यासाचा व अनुभवाचा पक्षाच्या वाढीसाठी फायदा होणार आहे. त्यांच्या या निवडीनंतर शहापूरचे आमदार दौलत दरोडा यांच्यासह अनेकांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

### आदिवासी विकास महामंडळातर्फे शेतकऱ्यांसाठी आवाहन

**किन्हवली:** महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ प्रादेशिक कार्यालय जव्हारतर्फे आधारभूत किंमत खरेदी योजनेत ज्या शेतकऱ्यांना खरीप पणन हंगामात 2023-24 मधील प्रोत्साहनपर राशी म्हणजेच बोनस व धान्याचा मोबदला अद्याप मिळाला नाही, अशा शेतकऱ्यांनी आदिवासी विकास महामंडळाकडे संपर्क साधण्याचे आवाहन महामंडळातर्फे करण्यात आले आहे.

आधारभूत किंमत खरेदी योजना खरीप पणन हंगाम 2023-24 मध्ये धान उत्पादक शेतकऱ्यांना प्रति हेक्टरी रक्कम 20 हजार रुपये प्रोत्साहनपर राशी राज्य शासनाने मंजूर केली होती. त्यानुसार शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर राशी म्हणजेच बोनस व धान्याचे चुकारे अदा करण्यात आले आहेत. मात्र काही तांत्रिक अडचणीमुळे अद्याप काही शेतकऱ्यांना बोनस व धान्याचे चुकारे अद्याप करण्यात आलेले नाहीत. ज्या शेतकऱ्यांना खरीप पणन हंगाम 2023-24 मधील बोनस व धान्याचा मोबदला अद्याप मिळाला नाही अशा शेतकऱ्यांनी स्वतःचे आधार कार्ड, बँक पासबुक, हंगाम 2023-24 मधील पीकपेरा नमूद केला असलेला व नोंदणी करतेवेळी खरेदी केंद्रावर सादर केलेला सातबारा उतारा व धानविक्री पावती घेऊन 3 आणि 4 नोव्हेंबर रोजी उपप्रादेशिक कार्यालय शहापूर या ठिकाणी कार्यालयीन वेळेत उपस्थित रहावे, असे आवाहन महाराष्ट्र राज्य आदिवासी विकास महामंडळ प्रादेशिक कार्यालय जव्हारचे प्रादेशिक व्यवस्थापक यांनी केले आहे.

## प्रवाशांना मोठा दिलासा

# कोकणातील रेल्वेगाड्यांना सिंधुदुर्ग, कणकवलीत थांबा



**मुंबई:** कोकण रेल्वे मार्गावरुन धावणाऱ्या चार रेल्वेगाड्यांपैकी दोन रेल्वेगाड्यांना सिंधुदुर्ग आणि कणकवली रेल्वे स्थानकांमध्ये थांबा देण्यात आला आहे. त्यामुळे प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे.

कोकण रेल्वे मार्गावरुन धावणाऱ्या चार रेल्वेगाड्यांपैकी दोन रेल्वेगाड्यांना सिंधुदुर्ग आणि कणकवली रेल्वे स्थानकांमध्ये थांबा देण्यात आला आहे. त्यामुळे प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे. कोकण रेल्वेवरील महत्त्वाच्या रेल्वे स्थानकांवर प्रमुख रेल्वेगाड्यांना थांबा देण्याची मागणी प्रवाशांकडून करण्यात येत होती. परंतु, तांत्रिक अडचणींमुळे या स्थानकांवर प्रमुख रेल्वेगाड्यांना थांबा देणे शक्य होत नव्हते. प्रवाशांची वाढती मागणी लक्षात घेऊन हिसार -कोयंबतूर एक्स्प्रेस, गांधीधाम - नागरकोइल एक्स्प्रेस या रेल्वेगाडीच्या दोन्ही दिशेकडील प्रवासाला कणकवली रेल्वे स्थानकात थांबा देण्यात येईल. तर, एर्नाकुलम जंक्शन-अजमेर एक्स्प्रेस, एर्नाकुलम जं. हजरत निजामुद्दीन एक्स्प्रेस या रेल्वेगाडीला सिंधुदुर्ग येथे थांबा देण्यात येणार आहे.

कोकण रेल्वेने दिलेल्या माहितीनुसार, कणकवली, सिंधुदुर्ग स्थानकांवर रेल्वेगाड्यांना प्रायोगिक तत्वावर थांबा देण्यात येणार आहेत. गाडी क्रमांक 12977एर्नाकुलम जंक्शन – अजमेर एक्स्प्रेसला सिंधुदुर्ग येथे 2 नोव्हेंबरपासून थांबा देण्यास सुरुवात झाली आहे.

**गाडी क्रमांक 16335 गांधीधाम-नागरकोइल एक्सप्रेसला कणकवली येथे 7 नोव्हेंबरपासून पहाटे 5.45 वाजता थांबा देण्यात येईल. ही रेल्वेगाडी सकाळी 6.32 वाजता पुढील प्रवासासाठी मार्गस्थ होईल. गाडी क्रमांक 16336 नागरकोइल गांधीधाम एक्सप्रेसला कणकवली येथे 11 नोव्हेंबरपासून दुपारी 2 वाजता थांबा देण्यात येईल. ही रेल्वेगाडी दुपारी 2.02 वाजता पुढील प्रवासासाठी मार्गस्थ होईल.**

सिंधुदुर्ग स्थानकात दुपारी 12.32 वाजता ही रेल्वेगाडी दोन मिनिटे थांबेल. त्यानंतर पुढील प्रवासासाठी मार्गस्थ होईल. गाडी क्रमांक 12978 अजमेर एर्नाकुलम एक्स्प्रेसला सिंधुदुर्ग स्थानकात 7 नोव्हेंबरपासून थांबा देण्यात येणार आहे. सिंधुदुर्ग स्थानकात सकाळी 11.46 वाजता ही रेल्वेगाडी दोन मिनिटे थांबेल. गाडी क्रमांक 22655 एर्नाकुलम जं. – हजरत निजामुद्दीन एक्स्प्रेसला सिंधुदुर्ग येथे 5 नोव्हेंबरपासून थांबा देण्यात येणार आहे. सिंधुदुर्ग स्थानकात सायंकाळी 7.08 वाजता ही रेल्वेगाडी दोन मिनिटे थांबेल. गाडी क्रमांक 22656 हजरत निजामुद्दीन -एर्नाकुलम जं. एक्स्प्रेसला सिंधुदुर्ग स्थानकात 7नोव्हेंबरपासून थांबा देण्यात येणार आहे. ही रेल्वेगाडी सिंधुदुर्ग स्थानकात सकाळी 7.20 वाजता दोन मिनिटे थांबेल.

गाडी क्रमांक 22475 हिसार-कोयंबतूर एक्स्प्रेसला कणकवली येथे 5 नोव्हेंबरपासून रात्री 9.46 वाजता थांबा देण्यात येईल. ही रेल्वेगाडी रात्री 9.48 वाजता पुढील प्रवासासाठी मार्गस्थ होईल. गाडी क्रमांक 22476 कोयंबतूर-हिसार एक्स्प्रेसला कणकवली येथे 8 नोव्हेंबरपासून सकाळी 6.30 वाजता थांबा देण्यात येईल. ही रेल्वेगाडी सकाळी 6.32 वाजता पुढील प्रवासासाठी मार्गस्थ होईल.

# उल्हासनगरच्या मध्यवर्ती रुग्णालयात दारू तस्करीचा प्रयत्न फसला



**उल्हासनगर :** उल्हासनगरच्या मध्यवर्ती रुग्णालयात रुग्णालय प्रशासनाच्या सतर्कतेमुळे मादक पदार्थांची तस्करी करण्याचा प्रयत्न उधळला गेला आहे. रुग्णाच्या एका नातेवाईकाला औषधाच्या पाकिटात लपवून दारुची बाटली घेऊन रुग्णालयात प्रवेश करताना सुरक्षा रक्षकांनी रंगेहाथ पकडले.

गुटखा, तंबाखू आणि दारूसारख्या मादक पदार्थांवर रुग्णालयात बंदी असूनही, काही व्यक्तींकडून छुप्या मार्गाने हे पदार्थ आत आणण्याचे प्रयत्न सुरु असतात. मात्र, मध्यवर्ती रुग्णालयाच्या कडक सुरक्षा व्यवस्थेमुळे असा प्रयत्न करणाऱ्यांना तत्काळ पकडले जात आहे. शनिवारी दुपारी, मध्यवर्ती रुग्णालयाच्या मुख्य प्रवेशद्वारावर सुरक्षा रक्षक तपासणी करत असताना, एका व्यक्तीच्या हालचालींवर त्यांना संशय आला. सुरक्षा रक्षकांनी त्या संशयित व्यक्तीला थांबवून त्याची झडती घेतली. झडतीदरम्यान, औषधाच्या पॅकेटमध्ये अत्यंत चलाखीने लपवून ठेवलेली दारुची बाटली आढळली. दारु घेऊन येणाऱ्या या व्यक्तीचे नाव गणेश चव्हाण असल्याचे समोर आले आहे.सुरक्षा रक्षकांनी दारुची बाटली त्वरित जप्त केली आणि गणेश चव्हाण याला रुग्णालयात प्रवेश करण्यास सक्त मनाई केली.

### प्रशासनाकडून सुरक्षेवर भर

**या घटनेनंतर रुग्णालय प्रशासनाने त्यांची भूमिका स्पष्ट केली. रुग्णालय प्रशासनाच्या म्हणण्यानुसार, रुग्णांना आणि त्यांच्या कुटुंबियांना सुरक्षित वातावरण देण्यासाठी हे कठोर पाऊल उचलण्यात आले आहे. आरोग्याचे मंदिर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या रुग्णालयात अशा मादक पदार्थांना अजिबात स्थान नाही. आम्ही रुग्णालयातील सुरक्षा व्यवस्था आणखी कडक केली असून, यापुढे कोणीही गुटखा, तंबाखू किंवा दारु आणण्याचा प्रयत्न केल्यास त्यांच्यावर कठोर कारवाई केली जाईल," असे प्रशासनाने सांगितले.**







**हाजुरीचे शाखाप्रमुख संदीप शेलार यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देताना शिवसेना सचिव संजय मोरे, शिवसेना सचिव आणि माजी स्थायी समिती सभापती राम रेपाळे, शहर प्रमुख, माजी महापौर अशोक वैती, माजी नगरसेवक जनार्दन खेतले, माजी नगरसेवक विजय पडवळ, परिवारातील सर्व सदस्य, माजी परिवहन समिती सभापती अनिल भोर, विभागप्रमुख शरद कणसे, विभाग प्रमुख भाई खाडे, रमाकांत पाटील, उपविभाग प्रमुख सुनील म्हामुणकर, दादा जाधव, हरिश्चंद्र मोकाशी, शशिकांत पवार, विलास कांबळी, उदय दांडेकर, दिनेश किलजे, नरेंद्र पाठारे, महिला आघाडी विभागप्रमुख रजनी महामुनकर, उपविभाग प्रमुख स्वाती देशमुख, अर्चना मोरे, वर्षा शेलार, सुनंदा इंदुलकर, राजेश सावंत, जलाल मुजावर, प्रल्हाद बोरसे, भरत काळे, मोहन साठे, मृणाल रेपाळे, प्रवीण भडवळकर, आशिष सावंत, संदीप इंदुलकर, प्रवीण शिंदे, अनंत शिगवण, सार्थक कांगणे, विभागातील शिवसेनेचे पदाधिकारी.**

छाया: रामसिंग

# अॅडॅप्टिव डीप ब्रेन स्टिम्युलेशन (ADBS) : पार्किन्सनच्या उपचारातली नवी स्मार्ट दिशा




पार्किन्सन हा मेंदूतील हालचाली नियंत्रित करणाऱ्या पेशींवर परिणाम करणारा एक दीर्घकालीन विकार आहे. या आजारामुळे रुग्णांना हातापायांची थरथर, हालचालींमध्ये मंदपणा, शरीराची कडकपणा आणि तोल जाण्याची समस्या जाणवते. सुरुवातीच्या टप्प्यात औषधोपचाराने लक्षणे नियंत्रित ठेवता येतात, मात्र कालांतराने औषधांचा प्रभाव कमी होतो आणि रुग्ण “ऑन” व “ऑफ” अशा अवस्थांमध्ये अडकतो. या अनिश्चित अवस्थेमुळे दैनंदिन कामकाजात अडथळे निर्माण होतात आणि रुग्णाचा आत्मविश्वासही कमी होतो.

अशावेळी न्युरोसायन्स क्षेत्रात उदयास आलेले अॅडॅप्टिव डीप ब्रेन स्टिम्युलेशन (Adaptive Deep Brain Stimulation-ADBS) हे तंत्रज्ञान पार्किन्सनच्या उपचारात आशेचा नवा किरण ठरत आहे. या उपचारात मेंदूच्या विशिष्ट भागात सूक्ष्म इलेक्ट्रोड बसवले जातात, जे असामान्य विद्युत संकेत नियंत्रित करून थरथर आणि मंद हालचाली कमी करतात. पारंपरिक डीबीएसमध्ये (Deep Brain Stimulation) या इलेक्ट्रोडकडून सतत समान प्रमाणात उत्तेजना दिली जाते. मात्र, अॅडॅप्टिव डीबीएस याहून अधिक प्रगत आहे हे उपकरण मेंदूतील बदल “ऐकते” आणि गरजेनुसार स्वतःच उत्तेजनेचे प्रमाण वाढवते किंवा कमी करते.

ठाण्यातील प्रसिद्ध न्युरोसर्जन डॉ. नरेन नायक हे या अत्याधुनिक तंत्रज्ञानाचे तज्ञ आहेत. ते किम्स हॉस्पिटल, ठाणे (KIMS Hospital) येथे पार्किन्सन व इतर मेंदूविकारांच्या उपचारासाठी हे तंत्रज्ञान वापरत आहेत. डॉ. नायक यांनी टोकियो विमेन्स मेडिकल युनिव्हर्सिटी, जपान येथून फंक्शनल न्युरोसर्जरीचे विशेष प्रशिक्षण घेतले आहे. त्यांनी गेल्या 15 वर्षांत शेकडो मेंदू शस्त्रक्रिया केल्या असून, भारतात प्रगत डीबीएस उपचार सुरु करण्यात त्यांचा मोठा वाटा आहे. 2015 मध्ये त्यांनी मुंबईतील ग्लेनेगल्स हॉस्पिटल, परळ येथे देशातील पहिल्या डीबीएस प्रोग्रामपैकी एकाची स्थापना केली होती.

डॉ. नायक सांगतात, “अॅडॅप्टिव डीबीएस म्हणजे रुग्णाला खऱ्या अर्थाने समजणारे उपकरण आहे. हे मेंदूच्या गरजेनुसार स्वतःला समायोजित करते, त्यामुळे रुग्णाला चालणे, बोलणे आणि दैनंदिन जीवन अधिक सुलभ होते.” हे तंत्रज्ञान मेंदूच्या क्रियाशीलतेचा रिअल-टाइम मागोवा घेते आणि त्यानुसार उत्तेजनेचे प्रमाण ठरवते. त्यामुळे हालचाली अधिक सुरळीत होतात, औषधांच्या डोसमध्ये बदल कमी होतात आणि उपकरणाचे आयुष्य वाढते. रुग्णांच्या अनुभवांनुसार अॅडॅप्टिव डीबीएसमुळे लक्षणांवर अधिक सातत्यपूर्ण नियंत्रण मिळते. थकवा, कंप आणि अनियमित हालचाली कमी होतात. तसेच, वारंवार रुग्णालयात जाऊन उपकरण री-प्रोग्राम करण्याची गरज राहत नाही, त्यामुळे रुग्ण आणि त्यांच्या कुटुंबियांचा ताण कमी होतो. अनेक रुग्णांना या उपचारामुळे पुन्हा आत्मसन्मान आणि आत्मविश्वास मिळत आहे.

पार्किन्सनपुरतेच नव्हे, तर अॅडॅप्टिव न्युरोमॉड्युलेशन तंत्रज्ञान एपिलेप्सी, ओसीडी (Obsessive Compulsive Disorder) आणि डिप्रेशनसारख्या विकारांवरही उपयोगी ठरत आहे. जगभरातील संशोधक या तंत्रज्ञानाचा वापर मेंदूशी संबंधित इतर विकारांच्या उपचारासाठी करण्याचा प्रयत्न करत आहेत. “अॅडॅप्टिव तंत्रज्ञानाचे वैशिष्ट्य म्हणजे ते प्रतिसादक्षम आहे. हे जास्त स्टिम्युलेशन देण्याबद्दल नाही, तर योग्य वेळी योग्य प्रमाणात देण्याबद्दल आहे,” असे डॉ. नायक स्पष्ट करतात. अॅडॅप्टिव डीबीएसचे आगमन हे पार्किन्सनसारख्या जटिल आजाराच्या उपचारात नवे पर्व ठरत आहे. हे तंत्रज्ञान रुग्णांना केवळ लक्षणांवर नियंत्रण देत नाही, तर नव्याने स्वातंत्र्य, आत्मसन्मान आणि आशाही देते. दीर्घकाळ औषधांच्या वेळापत्रकांशी झगडणाऱ्या रुग्णांसाठी हे तंत्रज्ञान पुन्हा जीवन त्यांच्या हातात देणारे आहे.



**-डॉ. नरेन नायक**
**किम्स हॉस्पिटल (KIMS Hospital)**
**को-ऑपरेटिव्ह सोसायटी, 105, क्विन्स स्ट्रीट, ब्रेंटफर्डजवळ, हिरानंदानी इस्टेट, ठाणे (पश्चिम), 400615**

# प्रतिबंधित कोरेक्स सिरपच्या ४०० बाटल्यांसह एकजण ताब्यात




**कल्याण:** कल्याण शहरात अंमली पदार्थांच्या (नशील्या वस्तूंच्या) अवैध विक्रीवर नियंत्रण मिळवण्यात पोलिसांना मोठे यश मिळाले आहे. पोलीस उपायुक्त अतुल झेंडे यांच्या आदेशानुसार तयार केलेल्या विशेष पथकाने शनिवारी महत्त्वपूर्ण कारवाई करत छापा टाकला आणि त्यात प्रचंड प्रमाणात अंमली (मादक) कोरॅक्स सिरपचा साठा हस्तगत केला. ही धडक कारवाई बाजारपेठ पोलीस स्टेशनच्या हद्दीत केली.

उप आयुक्त परिमंडळ 3 यांचे विशेष कारवाई पथक सहायक पोलिस निरीक्षक अनिल गायकवाड व त्यांचे पथक हे बाजारपेठ पोलीस ठाणे हद्दीत अमली पदार्थ विरोधी कारवाई कामी गस्तीवर असताना एपीएमसी मार्केटजवळ, फोर्टिस हॉस्पिटलच्या नजीक, एका व्यक्तीला मोटरसायकलवर संशयास्पद स्थितीत काही वस्तू घेऊन जाताना पाहिले. संशयावरून त्याला थांबवून त्याची तपासणी केली असता, त्याच्याजवळ कोरेक्स सिरपच्या 400 बाटल्या आढळून आल्या. पोलिसांनी घटनास्थळीच पाच पंचांच्या उपस्थितीत जप्तीची कारवाई पूर्ण केली.

अटक केलेल्या व्यक्तीची नाव मोहम्मद मेहताब अनीस (33), जो गोल्डन प्लाझा, मौलाना शौकत अली चौक, कल्याण येथे राहणारा आहे. आरोपीला प्रतिबंधित सिरपसह ताब्यात घेऊन बाजारपेठ पोलीस स्टेशनमध्ये आणण्यात आले. त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

जप्त केलेल्या मालाची एकूण अंदाजित किंमत सुमारे चार लाख 63,660 इतकी आहे, ज्यात कोरेक्स सिरप चार लाख रुपये किमतीच्या 400 बाटल्या. मोटरसायकल 60 हजार रुपये किमतीची आणि 3,660 रुपये रोख रक्कम यांचा समावेश आहे.


# ठाण्यातील ‘बाबा पाव भाजी’ रेस्टॉरंटमध्ये स्वादिष्ट पावभाजीसोबत आकर्षक ऑफर्स




WHAT'S NEW ठाणे

ठाणे शहरातील फूडींसाठी आनंदाची बातमी! ‘बाबा पाव भाजी अँड मल्टिक्यूझिन रेस्टॉरंट’ आता आपल्या खास पावभाजीसह विविध पदार्थांसाठी प्रसिद्ध झाले आहे. वागळे इस्टेट आणि वसंत विहार या दोन्ही ठिकाणी असलेल्या शाखांमध्ये ग्राहकांना नॉर्थ इंडियन, चायनीज आणि इटालियन अशा अनेक स्वादांचा अनुभव मिळतो.

या रेस्टॉरंटची खासियत म्हणजे त्यांची “बटर-लोडेड पावभाजी”, जी स्थानिक फूडींमध्ये प्रचंड लोकप्रिय झाली आहे. तसेच, सध्या येथे शुक्रवार स्पेशल ऑफर अंतर्गत निवडक पदार्थांवर 25% सवलत दिली जात आहे.

‘बाबा पाव भाजी’ हे रेस्टॉरंट उशिरापर्यंत खुले असते आणि केटरिंग तसेच बल्क ऑर्डर्ससाठी विशेष सुविधा देखील उपलब्ध आहेत. हे ठिकाण सध्या ठाण्यातील पावभाजीसाठी प्रसिद्ध आहे.

**पत्ता: हिमगिरी हाऊसिंग सोसायटी रोड, वसंत विहार, लोक उपवन, ठाणे (प.)**


# कार्तिकी एकादशीनिमित्त श्री विठ्ठल मंदिरांत भाविकांची गर्दी



**ठाणे:** कार्तिकी एकादशीच्या पवित्र दिवशी ठाणे नगरी भक्तीच्या रंगात न्हाऊन निघाली. पहाटेपासूनच ढोकाळी, बाळकुम, मानपाडा, गावदेवी विठ्ठल मंदिर आणि मुख्य बाजारपेठेतील पेशवेकालीन श्री विठ्ठल मंदिरात दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी झाली. पांडुरंगाच्या मूर्तीवर ब्रह्ममुहूर्तावर अभिषेक-पूजा, काकडा आरती, भजन, कीर्तन आणि नामस्मरणाच्या कार्यक्रमांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला.

श्री विश्वनाथ विनायक पंडित ट्रस्टतर्फे दरवर्षीप्रमाणे यंदाही हा उत्सव भक्तिभावाने साजरा करण्यात आला. पहाटेपासूनच वारकरी हरी नामाच्या गजरात दंग झाले होते. मंदिरात श्री विठ्ठल-रखुमाई, श्री माता पार्वती देवी, श्री शिवपिंड आणि श्री सप्तश्रृंगी देवी यांच्या मूर्तींना फुलांनी सुंदर सजावट करण्यात आली होती. प्रसाद म्हणून केळी आणि राजगिऱ्याचा लाडू भक्तांना वितरित करण्यात आला. संध्याकाळी दीपोत्सव व महाआरतीने मंदिर परिसर उजळून निघाला. सकाळी पाच ते रात्री दहा वाजेपर्यंत भाविकांनी दर्शनाचा लाभ घेतला.

आषाढी एकादशीला पांडुरंग योगनिद्रेत जातात, तर कार्तिकी एकादशीला ते जागृत होतात, या श्रद्धेने भाविक मोठ्या संख्येने मंदिरात येतात. ठाण्याच्या या ऐतिहासिक श्री विठ्ठल मंदिरात साजरा होणारा कार्तिकी एकादशीचा उत्सव वारकरी परंपरेचा अविभाज्य भाग बनला आहे. भक्ती, श्रद्धा आणि प्रेमाने ओथंबलेला हा सोहळा ठाणेकरांसाठी आकर्षण ठरतो, असे श्री विश्वनाथ विनायक पंडित ट्रस्टचे विश्वस्त यतीन पंडित यांनी सांगितले.

# अर्थजगत

*भारतीय भांडवली बाजारातील नियमन नेहमीच काटेकोर राहिले आहे, विशेषतः जेव्हा त्याचा संबंध सर्वसामान्य गुंतवणूकदारांच्या पैशाशी येतो तेव्हा बाजार नियामक संस्था म्हणजेच सेबी, प्रसंगी कठोर उपाय योजण्यासही मागेपुढे पहात नाही. सध्या सेबीच्या अशाच एका निर्णयामुळे देशातील म्युच्युअल फंड उद्योगांमध्ये काहीसे नाराजीचे वातावरण पसरले आहे. अलीकडेच सेबीने म्युच्युअल फंडांना प्री-आयपीओ शेअर्समध्ये (म्हणजेच एखादी कंपनी सार्वजनिक होण्याआधी खासगी पद्धतीने विकले जाणारे शेअर्स) गुंतवणूक करण्यास बंदी घातली आहे. या निर्णयाने गुंतवणूकदार संरक्षण आणि गुंतवणूक स्वातंत्र्य या दोन मुद्द्यांमधील संघर्ष पुन्हा चर्चेत आला आहे.*

## प्री-आयपीओ बंदी आणि म्युच्युअल फंड




एखादी कंपनी शेअर बाजारात सूचीबद्ध होण्यापूर्वी म्हणजेच आयपीओ (इनिशियल पब्लिक ऑफरींग) येण्याआधी, ती काही समभाग म्युच्युअल फंड, विदेशी पोर्टफोलिओ गुंतवणूकदार आणि फॅमिली ऑफिसेस ह्यांसारख्या मोठ्या संस्थात्मक गुंतवणूकदारांना खासगी करारांद्वारे विकते. यालाच प्री-आयपीओ गुंतवणूक म्हणून ओळखले जाते. ही प्रक्रिया कंपनीला गुंतवणूकदारांचा प्रतिसाद जाणून घेण्यासाठी आणि शेअरच्या किमतीसाठी योग्य श्रेणी ठरवण्यासाठी मदत करते. अशा प्री-आयपीओ डील्स सहसा आयपीओच्या किंमतीपेक्षा काही प्रमाणात सवलतीत मिळतात ह हीच बाब म्युच्युअल फंडांसाठी आकर्षक ठरते.

याशिवाय, अशा गुंतवणुकीसाठी सखोल मूल्यांकन आवश्यक असते. त्यामध्ये संस्थात्मक गुंतवणूकदार पारंगत असतात. त्यामुळे या प्रकारच्या गुंतवणुकींनी ऐतिहासिकदृष्ट्या फंड हाऊसेसना चांगले परतावे दिले आहेत. तसेच किरकोळ गुंतवणूकदारांनाही याचा फायदा झालेला आहे. विद्यमान नियमांनुसार, म्युच्युअल फंड फक्त सूचीबद्ध किंवा लवकरच सूचीबद्ध होणाऱ्या सिक्युरिटीजमध्येच गुंतवणूक करू शकतात. परंतु प्री-आयपीओ शेअर्समध्ये एक मोठी अडचण आहे ह त्यांची लिस्टिंग तारीख निश्चित नसते. काही कारणास्तव जर कंपनीने आयपीओ आणण्याची तारीख पुढे ढकलली किंवा तो निर्णयच रद्द केला तर म्युच्युअल फंडांकडे अनलिस्टेड शेअर्स अडकून पडतात. अशा स्थितीत तरलता आणि मूल्यांकन या दोन्ही बाबतीत धोके निर्माण होतात. याच कारणामुळे सेबीने यावर बंदी आणली असून नियामकांच्या मते ही बंदी गुंतवणूकदारांच्या संरक्षणासाठी आवश्यक आहे. फंड मॅनेजरांच्या कौशल्याबाबत सेबीला कसलीही अडचण नाही. सेबीला त्यांच्या गुंतवणुकींच्या स्वरूपावर आणि जोखमींच्या मर्यादांवर नियंत्रण आणायचे आहे.

असे असले तरी फंड हाऊसेस मात्र याला अन्यायकारक निर्बंध मानत आहेत. याचे कारण प्री-आयपीओ मार्केटमुळे त्यांना दोन महत्त्वाचे फायदे मिळत होते. एक म्हणजे आकर्षक प्रवेश किंमत आणि उच्च मागणी असलेल्या कंपन्यांमध्ये आधीच निश्चित वाटा (ॲलोकेशन). त्यांच्या मते, याच टप्प्यांवर खऱ्या अर्थाने 'प्राईस डिस्कव्हरी' म्हणजे मूल्यनिर्धारण होते. अशा व्यवहारांमध्ये संस्थात्मक सहभाग असल्यानं बाजारभाव अधिक वास्तववादी ठरतो. फंड हाऊसेसचे म्हणणे आहे की, त्यांच्याकडे आधीपासूनच जोखीम व्यवस्थापनाची काटेकोर प्रणाली आहे आणि अशा व्यवहारांवरील अंतर्गत देखरेख सशक्त आहे. त्यामुळे सर्व फंडांना एकाच चौकटीत बसवणे हे काहीसे अन्यायकारक आहे. याशिवाय, परदेशी गुंतवणूकदार आणि फॅमिली ऑफिसेस यांना अशा गुंतवणुकींमध्ये भाग घेण्याची परवानगी कायम ठेवल्यामुळे देशांतर्गत फंडांना तुलनात्मकदृष्ट्या मागे टाकले जात असल्याचे फंड हाऊसेसचे म्हणणे आहे. भारताचा म्युच्युअल फंड उद्योग जागतिक मानकांनुसार आधीच कठोर नियामक चौकटीत कार्य करतो. परदेशातील फंडांप्रमाणे त्यांना खाजगी गुंतवणुकींच्या किंवा पर्यायी मालमत्तांच्या संधी फारशा उपलब्ध नाहीत. प्री-आयपीओ गुंतवणूक हा एकमेव मार्ग होता ज्याद्वारे ते आपल्या गुंतवणूकदारांना जास्तीचा परतावा देऊ शकत होते आणि पोर्टफोलिओ इतरांपेक्षा वेगळे ठेवू शकत होते. आता या दारावर कुलूप बसवून सेबीने नकळत गुंतवणूकदार संरक्षण या नावाखाली नवोपक्रम रोखला आहे, असे अनेक तज्ज्ञांचे मत आहे. उद्दिष्ट योग्य असले तरी याचे परिणाम उलट दिशेने जाऊ शकतात. तज्ज्ञांच्या मते सेबीने या क्षेत्रात पूर्ण बंदी घालण्याऐवजी सूक्ष्म आणि टप्प्याटप्प्याने नियम आखले पाहिजेत. उदाहरणार्थ, ज्या कंपन्यांनी सेबीकडे ड्राफ्ट रेड हेरींग प्रॉस्पेक्टसह्र(डीआरएचपी) दाखल केलेले आहे, त्या कंपन्यांमध्ये गुंतवणुकीची परवानगी असायला हवी. तसेच कंपन्यांान एखाद्या निश्चित कालावधीतच आयपीओ आणणे बंधनकारक करता येऊ शकेल. याशिवाय असूचीबद्ध शेअर्सच्या मूल्यांकनाची पारदर्शक पद्धत व तफावत स्पष्टपणे उघड करणे बंधनकारक करावे. अशा पद्धतीने सेबी गुंतवणूकदारांचे हितसुद्धा सुरक्षित ठेवू शकेल आणि म्युच्युअल फंड उद्योगालाही स्पर्धात्मक संधी देऊ शकेल.

***सेबीची भूमिका गुंतवणूकदारांच्या संरक्षणासाठी योग्य आहे, परंतु तिचा अंमलबजावणीचा मार्ग अधिक समतोल असायला हवा. म्युच्युअल फंड उद्योग हा भारताच्या आर्थिक प्रवासातील महत्त्वाचा स्तंभ आहे, आणि त्याला नव्या गुंतवणूक संधींपासून वंचित ठेवणे म्हणजे स्वतःच्या भांडवली बाजाराच्या वाढीला ब्रेक लावणे. नियमन आणि नवोपक्रम यांचा समतोल राखला गेला, तरच भारतीय म्युच्युअल फंड उद्योग खऱ्या अर्थाने जागतिक पातळीवर स्पर्धा करू शकेल.***

## विमा पोर्ट केल्यानंतर क्लेम करताय?

आरोग्य विमा कंपनी बदलणे म्हणजेच 'पोर्टिंग' ही कल्पना आज अनेकांना आकर्षक वाटते. प्रीमियम कमी, सेवा सुधारलेली किंवा कव्हरेज अधिक असेल या अपेक्षेने लोक कंपनी बदलण्याचा निर्णय घेतात. परंतु, फक्त कंपनी बदलल्यानेच काम संपत नाही. कारण क्लेम मंजूर होईल की नाही, हे अनेक सूक्ष्म बाबींवर अवलंबून असते. योग्य माहिती, पूर्ण दस्तऐवज आणि अटींची स्पष्ट समज नसल्यास, क्लेम नाकारला जाण्याची शक्यता प्रचंड असते. विमाधारकांना वाटते की, त्यांनी प्रीमियम भरला म्हणजे त्यांचा क्लेम हमखास मंजूर होईल. पण प्रत्यक्षात तसे नसते. विमा कंपनीकडे नियमांची शिस्तबद्ध चौकट असते. खालील कारणांमुळे अनेक दावे नाकारले जातात ह

◆ विमाधारकाने पूर्वीच्या आजारांविषयी प्रामाणिक माहिती दिली नाही, तर कंपनीला तो धोका म्हणून वाटतो आणि ती क्लेम नाकारते.

◆ पोर्टिंगच्या आधी सुरू केलेला उपचार नवीन कंपनी कवर करत नाही. कारण तो जुनी पॉलिसी सुरू असताना झालेला खर्च मानला जातो.

◆ प्रत्येक विमा कंपनीचे नियम आणि कव्हरेज पॉलिसीनुसार वेगळे असतात. जुन्या कंपनीकडून मिळालेला लाभ नवीन ठिकाणी आपोआप लागू होत नाही.

◆ नवीन कंपनी तुमच्या आरोग्यस्थितीचे स्वतंत्र मूल्यांकन करते आणि त्यावरूनच कोणता आजार कव्हर करायचा आणि कोणता नाही याचा निर्णय घेते.




◆ अपूर्ण रिपोर्टस, चुकीच्या तारखा किंवा पॉलिसीतील माहितीतील विसंगती यामुळेही क्लेम रिजेक्ट होतो. प्रत्येक आरोग्य विमा पॉलिसीमध्ये काही आजारांवर ठरावीक वेटिंग पिरीयड (प्रतीक्षा कालावधी) असतो. उदाहरणार्थ, काही आजारांवर तीन वर्षांचा वेटिंग पिरीयड असेल, तर त्या काळात त्या आजारासाठी क्लेम मिळत नाही. एखाद्याने दोन वर्षे जुनी पॉलिसी पोर्ट केली, तर नवीन कंपनी बाकीचा एक वर्षाचा कालावधी पुन्हा मोजू शकते. त्यामुळे विमाधारकाने हे आधीच स्पष्ट करून घ्यायला हवे की जुन्या पॉलिसीतील वेटिंग पिरीयड कितपत ट्रान्सफर होत आहे. पोर्टिंग ही सुविधा योग्य वापरली तर ती विमाधारकासाठी अत्यंत फायदेशीर ठरू शकते. यामुळे ग्राहकाला अधिक चांगले कव्हरेज, कमी प्रीमियम आणि उत्तम ग्राहकसेवा मिळू शकते. आरोग्य विमा क्षेत्रातील स्पर्धेमुळे कंपन्यांमध्ये सुधारणा होत राहतात आणि ग्राहकांना पर्याय उपलब्ध होतात. परंतु, या प्रक्रियेत फायदा मिळवण्यासाठी स्पष्टता, पारदर्शकता आणि जागरूकता या तीन गोष्टी अनिवार्य आहेत. चुकीची माहिती, अपूर्ण कागदपत्रे आणि नियमांची अज्ञानता या सर्व गोष्टी एकत्र येऊन क्लेम नाकारला जाण्याचे मोठे कारण बनतात.

### क्लेम नाकारला जाऊ नये, यासाठी काय करावे?

◆ पोर्टिंग करताना सर्व माहिती प्रामाणिकपणे आणि पूर्णपणे द्या.

◆ जुन्या पॉलिसीची कागदपत्रे, मेडिकल रिपोर्ट्स आणि क्लेम हिस्ट्री व्यवस्थित सांभाळा.

◆ नवीन कंपनीकडून लिखित स्वरूपात विचारणा करा की कोणते वेटिंग पिरीयड ट्रान्सफर झाले आहेत.

◆ जर उपचार सुरू असेल किंवा शस्त्रक्रिया नियोजित असेल, तर आधी नवीन कंपनीकडून कव्हरेजची पुष्टी घ्या.

◆ सर्व संवाद आणि दस्तऐवज स्पष्ट ठेवा, जेणेकरून पुढे गैरसमज होणार नाही. ◆◆◆

## 'लेन्सकार्ट'च्या आयपीओत गुंतवणूक करताय?

भारतातील अग्रगण्य आयवेअर ब्रँड लेन्सकार्ट शेअर बाजारात पदार्पण करण्यास सज्ज झाला आहे. अनेक महिन्यांपासून प्रतीक्षा असलेल्या या बहुचर्चित आयपीओला शेवटी हिरवा कंदील मिळाला असून, कंपनीने आपल्या सार्वजनिक समभाग विक्रीसाठीचा प्राईस बँड ३८२ ते ४०२ रुपये असा निश्चित केला आहे. शुक्रवार, ३१ ऑक्टोबरपासून सुरू झालेली ही प्रक्रिया ४ नोव्हेंबरपर्यंत खुली राहील. लेन्सकार्टने ७,२७८ कोटी रुपयांच्या या प्रस्तावाद्वारे सुमारे ६९,७०० कोटींचे मूल्यांकन (व्हॅल्युएशन) साध्य करण्याचे लक्ष्य ठेवले आहे. कंपनीचा उद्देश केवळ देशांतर्गत बाजारात नव्हे, तर आग्नेय आशिया आणि मध्यपूर्वेसारख्या जागतिक बाजारातही आपली पकड मजबूत करण्याचा आहे.

**आयपीओची रचना :** या सार्वजनिक प्रस्तावात २,१५० कोटी रुपयांचे नवीन समभाग (फ्रेश इश्यू) जारी केले जातील, तर उर्वरित ५,१२८ कोटी रुपये ऑफर फॉर सेल अंतर्गत प्रमोटर्स आणि गुंतवणूकदारांकडून विक्रीतून मिळतील. या अंतर्गत एकूण १२.७५ कोटी समभाग बाजारात विकले जातील. कंपनीचे संस्थापक पियूष बंसल, नेहा बंसल, अमित चौधरी आणि सुमीत कपाही, तसेच सॉफ्टबँक, टेमासेक, केदारा कॅपिटल आणि अल्फा वेव्ह व्हेंचर्स यांसारखे गुंतवणूकदार यामध्ये आपली हिस्सेदारी कमी करतील. सेबीच्या नियमांनुसार, या प्रस्तावातील ७५ टक्के हिस्सा पात्र संस्थात्मक गुंतवणूकदारांसाठी, १५ टक्के हिस्सा बिगर-संस्थात्मक गुंतवणूकदारांसाठी आणि १० टक्के हिस्सा किरकोळ गुंतवणूकदारांसाठी राखून ठेवण्यात आला आहे. पात्र कर्मचाऱ्यांना दर समभागावर १९ रुपयांची सवलत देण्यात येत आहे.

**लॉट साईज आणि गुंतवणुकीची रक्कम :** या आयपीओचा लॉट साइज ३७ समभागांचा आहे. म्हणजेच किरकोळ गुंतवणूकदारांना किमान ३७ शेअर्ससाठी अर्ज करावा लागेल. त्यासाठी सुमारे १४,८७४ रुपयांची किमान गुंतवणूक आवश्यक असेल.



**शेअर वाटप आणि लिस्टिंग :** लेन्सकार्टच्या समभागांचे वाटप ६ नोव्हेंबर रोजी निश्चित होण्याची शक्यता आहे. पात्र गुंतवणूकदारांच्या डिमॅट खात्यात शेअर्स ७ नोव्हेंबर रोजी जमा केले जातील, तर अपात्र गुंतवणूकदारांना त्या दिवशीच पैसे परत केले जातील. शेवटी, कंपनीचे शेअर्स १० नोव्हेंबर रोजी बीएसई आणि एनएसईवर लिस्ट होतील.

**जोखीम घटक** : लेन्सकार्टचा व्यवसाय आकर्षक असला तरी त्यात काही जोखीमेही आहेत. पहिली बाब म्हणजे आयातीवर अवलंबित्व. हकंपनी आपल्या फ्रेम्स आणि काही कच्चा माल चीनमधून मागवते. चीनमधील बोआफेंग फ्रेमकार्ट टेक नावाच्या संयुक्त उपक्रमात लेन्सकार्टची ५१ टक्के हिस्सेदारी आहे. जर चीनमधील पुरवठा साखळीवर परिणाम झाला, तर कंपनीच्या उत्पादन आणि विक्रीवर थेट परिणाम होऊ शकतो.

दुसरी जोखीम म्हणजे तांत्रिक प्रगतीचा प्रभाव. लॅसिक सर्जरी, स्माईल सर्जरी, लेझर सर्जरीसारख्या आधुनिक पद्धती गेल्या काही वर्षांत लोकप्रिय होत आहेत. या तंत्रज्ञानाचा वापर वाढल्यास चष्म्यांच्या मागणीवर दीर्घकालीन परिणाम होऊ शकतो.

तिसरी जोखीम म्हणजे फ्रँचायझीवरील नियंत्रणाचा अभाव. लेंसकार्टचे सुमारे २२ टक्के रिटेल स्टोअर्स फ्रँचायझी मॉडेलवर चालतात. कंपनीकडे या फ्रँचायझींवर पूर्ण आर्थिक किंवा कार्यकारी नियंत्रण नाही. त्यामुळे एखाद्या फ्रँचायझीकडून चुकीचा व्यवहार झाला, तर ब्रँडच्या प्रतिमेला धक्का लागू शकतो, असे जाणकारांचे म्हणणे आहे.

**कंपनीची आर्थिक स्थिती :** वित्त वर्ष २०२५ मध्ये लेन्सकार्टने २९७ कोटी रुपयांचा निव्वळ नफा कमावला, जो मागील वर्षाच्या तुलनेत मोठी झेप होती ह कारण २०२४ मध्ये कंपनीला १० कोटी रुपयांचा तोटा झाला होता. उत्पन्नात २२ टक्क्यांची वाढ झाली असून ते ६,६२५ कोटी रुपयांवर पोहोचले आहे. देशात कंपनीचे २,०६७ स्टोअर्स आहेत, तर परदेशात ६५६ स्टोअर्स कार्यरत आहेत.

**गुंतवणूकदारांसाठी याचा अर्थ काय?**

लेन्सकार्टचा आयपीओ तंत्रज्ञान, रिटेल आणि ब्रँड वैविध्य यांचा अनोखा संगम आहे. कंपनीचे वितरण जाळे मजबूत आहे आणि ग्राहकांचा विश्वास मोठ्या प्रमाणात मिळवला आहे. मात्र, ती जागतिक बाजारातील स्पर्धा, पुरवठा साखळीतील जोखीम आणि तांत्रिक बदल या सर्वांवर अवलंबून राहते. त्यामुळे हा प्रस्ताव दीर्घकालीन गुंतवणुकीसाठी उपयुक्त ठरू शकतो, पण अल्पकालीन नफ्यासाठी काही प्रमाणात जोखीम स्वीकारावी लागेल.

लेन्सकार्टचा आयपीओ केवळ एका आयवेअर कंपनीचा बाजारात प्रवेश नाही, तर भारतीय स्टार्टअप इकोसिस्टमसाठी एक महत्त्वाचा टप्पा आहे. डिजिटलायझेशन, ब्रँडिंग आणि जागतिक विस्ताराच्या यशस्वी रणनीतींचा हा एक आदर्श नमुना आहे. ◆◆◆

## बँक शेअर्सवरील वेटेज मर्यादा बदलणार बाजाराचा खेळ

भारतीय भांडवली बाजारात मोठा बदल घडवणारा निर्णय बाजार नियंत्रक संस्था सेबीने घेतला आहे. विशेषतः बँकिंग क्षेत्रातील निर्देशांक म्हणजे बँकनिफ्टी, फिननिफ्टी आणि बँकेक्स या तीनही निर्देशांकांवर या निर्णयाचा परिणाम होणार आहे. सेबीच्या या निर्णयानुसार, कोणत्याही एका बँकेचे वजन (वेटेज) आता निर्देशांकांमध्ये २० टक्क्यांपेक्षा अधिक राहू शकत नाही आणि सर्वात मोठ्या तीन बँकांचे एकत्रित वजन ४५ टक्क्यांपर्यंत मर्यादित राहील. सेबीच्या या सुधारणांमुळे शेअर बाजारातील बँकिंग निर्देशांकांचे स्वरूप, त्यातील अस्थिरता आणि गुंतवणूकदारांचे धोरण ह या सर्वांमध्ये मोठे बदल दिसतील.

आतापर्यंत बँकिंग निर्देशांकांची दिशा काही मोजक्या मोठ्या बँकांवर अवलंबून होती. एचडीएफसी बँक, आयसीआयसीआय बँक किंवा भारतीय स्टेट बँक यांसारख्या बँकांचा वाटा इतका मोठा होता की त्यांच्या शेअर किमतींमधील थोडासा बदलदेखील संपूर्ण निर्देशांकाला वर-खाली करत असे. त्यामुळे बाजारातील संतुलन बिघडत होते आणि गुंतवणूकदारांच्या परताव्यांमध्ये अनावश्यक चढउतार दिसत होते. सेबीला या एकसंधतेऐवजी विविधतेला प्रोत्साहन द्यायचे आहे. यामागे निर्देशांक अधिक संतुलित, पारदर्शक आणि वास्तव स्वरूप दाखवणारा व्हावा, हे सेबीचे उद्दिष्ट आहे.

**नव्या नियमांनुसार आता प्रत्येक बँकिंग** निर्देशांकात किमान १४ बँकांचे शेअर्स असणे बंधनकारक असेल. कोणत्याही एका बँकेचा वाटा २० टक्क्यांपेक्षा जास्त असू शकत नाही आणि पहिल्या तीन बँकांचे मिळून एकूण वजन ४५ टक्क्यांवर थांबवावे लागेल. त्यामुळे कोणतीही एक बँक निर्देशांकावर हुकूमत गाजवू शकणार नाही. या नियमांमुळे निर्देशांक खऱ्या अर्थाने विविधीकृत (डायव्हर्सिफाईड) होतील आणि एखाद्या मोठ्या बँकेच्या घसरणीने संपूर्ण बँकिंग निर्देशांक कोसळणार नाही.




सेबीच्या परिपत्रकानुसार हे बदल टप्प्याटप्प्याने लागू केले जातील. बँकनिफ्टीसाठी ही प्रक्रिया चार टप्प्यांत पूर्ण केली जाईल, जेणेकरून बाजारातील गुंतवणूकदारांना अचानक धक्का बसणार नाही. पहिल्या टप्प्यात ज्या बँकेचे वजन सध्या जास्त आहे ते थोडेसे कमी केले जाईल आणि पुढील प्रत्येक टप्प्यात ते क्रमाक्रमाने कमी करून २० टक्क्यांच्या मर्यादेपर्यंत आणले जाईल. प्रत्येक टप्प्यानंतर सेबी आणि संबंधित शेअर एक्सचेंज हे वेटेज पुन्हा तपासतील, जेणेकरून संतुलन राखले जाईल. बँकनिफ्टीमध्ये हे बदल मार्च २०२६ पर्यंत पूर्ण होतील. दुसरीकडे बँकेक्स आणि फिननिफ्टीमध्ये हे बदल एकाच टप्प्यात म्हणजे डिसेंबर २०२५ पर्यंत लागू होतील.

**गुंतवणूकदारांवर थेट परिणाम**

या बदलांचा परिणाम गुंतवणूकदारांवर थेट होणार आहे. आता बँकनिफ्टी आणि फिननिफ्टी हे निर्देशांक पूर्वीपेक्षा कमी चढउतार असलेले म्हणजे कमी अस्थिरतेचे ठरतील. त्यामुळे ईटीएफ आणि निर्देशांक निधीमध्ये गुंतवणूक करणाऱ्यांना अधिक स्थिर आणि संतुलित परतावा मिळेल. एखाद्या मोठ्या बँकेच्या शेअरमध्ये पडझड झाली तरी संपूर्ण निर्देशांक त्यावर अवलंबून राहणार नाही. ट्रेडर्सना देखील अधिक विविधीकृत पोर्टफोलिओमध्ये व्यवहार करण्याची संधी मिळेल.

**सेबीचा हेतू**

सेबीचा हेतू म्हणजे बाजारात पारदर्शकता, न्याय्यपणा आणि विश्वास वाढवणे हा आहे. बँकिंग निर्देशांक आता केवळ काही बँकांच्या हालचालीवर नाही, तर संपूर्ण क्षेत्राच्या वास्तव कामगिरीवर आधारित राहतील. त्यामुळे हे नियम केवळ तांत्रिक सुधारणाच नव्हेत, तर गुंतवणूकदारांच्या हितासाठी केलेले धोरणात्मक पाऊल आहे. ◆◆◆

## सचिनने ५८ लाखांची करसवलत कशी मिळवली?

सन २००० च्या दशकाच्या सुरुवातीस सचिन तेंडुलकर केवळ क्रिकेटपटू नव्हता. तो ब्रँड सचिन बनला होता. प्रत्येक जाहिरातदाराला त्यांच्या चेहऱ्याची झलक हवी होती. ईएसपीएन, स्टार स्पोर्टस्, पेप्सी, व्हिसा, बूस्ट यांसारख्या सर्व आंतरराष्ट्रीय ब्रँडसाठी सचिनचे जाहिरात शूटस् परदेशात होत होते आणि त्या कामातून त्याला मोठ्या प्रमाणावर परकीय चलनात उत्पन्न मिळत होते. त्या काळात हे उत्पन्न एकूण सुमारे ५.९२ कोटी रुपये होते.




याच ठिकाणी त्याने कलम ८०आरआरचा वापर केला. आयकर कायद्यानुसार हे कलम लेखक, कलाकार, संगीतकार किंवा अभिनेते यांना परदेशातून मिळालेल्या उत्पन्नावर ३० टक्के वजावट देते. म्हणजेच जर तुमचे कलात्मक कार्य परदेशात झाले आणि त्यासाठी पैसे मिळाले, तर त्या रकमेतील थेट ३० टक्के भाग करमुक्त ठरतो.

सचिनने आपल्या कर विवरणपत्रात दाखवले की त्या जाहिरातींमधील काम हे 'क्रिकेट' नव्हे तर 'अभिनय' आहे. त्याने स्पष्ट केले की हे उत्पन्न मॉडेलिंग आणि ॲक्टिंग या व्यावसायिक स्वरूपातून मिळाले आहे आणि त्यामुळे ८०आरआरअंतर्गत वजावट लागू होते. परंतु आयकर विभागाने ही भूमिका मान्य केली नाही. त्यांचा युक्तिवाद होता की सचिन मुख्यतः क्रिकेटपटू आहे; जाहिराती हे त्याच्या क्रिकेट करिअरचे उपउत्पन्न आहे आणि त्यामुळे त्यावर कलाकार म्हणून सवलत मिळू शकत नाही.

हे प्रकरण पुढे आयकर अपीलीय न्यायाधिकरणापर्यंत गेले. तेथे मुख्य प्रश्न होता ह सचिनचा अभिनय हा कलात्मक प्रदर्शनात मोडतो का? आणि एकाच व्यक्तीला दोन वेगवेगळ्या व्यावसायिक ओळखी असू शकतात का?

न्यायाधिकरणाने या दोन्ही प्रश्नांवर महत्त्वाचा निर्णय दिला. त्यांनी नमूद केले की, अभिनय किंवा मॉडेलिंग हे सर्जनशील कल्पनाशक्ती, कौशल्य आणि सौंदर्यपूर्ण सादरीकरण यांचा संगम असलेले कार्य आहे. त्यामुळे जाहिरातीत सचिन जेव्हा कलाकार म्हणून परफॉर्म करतो तेव्हा तो एक स्वतंत्र 'कलात्मक व्यवसाय' ठरतो. न्यायाधिकरणाने पुढे स्पष्ट केले की एखाद्या व्यक्तीला एकापेक्षा अधिक व्यवसाय असू शकतात; सचिन क्रिकेटपटू म्हणून एक व्यवसाय करतो आणि कलाकार म्हणून दुसरा. त्यामुळे आयटीएटीने सचिनच्या बाजूने निकाल दिला आणि त्यांना ८०आरआरअंतर्गत ३० टक्के वजावट मंजूर केली. या वजावटीची एकूण रक्कम होती १.७७ कोटी रुपये. यामुळे सचिनच्या प्रत्यक्ष करामध्ये ५८ लाखांची बचत झाली.

हा निकाल केवळ एका खेळाडूच्या कर नियोजनाबद्दल नव्हे, तर भारतीय व्यावसायिकांच्या दृष्टीने एक महत्त्वाचा आदर्श ठरला. आज ग्लोबल प्लॅटफॉर्मवर काम करणारे इन्फ्लुएन्सर्स, यूट्यूबर्स, लेखक, संगीतकार किंवा कलाकार आपल्या परदेशी उत्पन्नावर कर नियोजन करताना या उदाहरणातून प्रेरणा घेऊ शकतात.

## भावनांवर नियंत्रण ठेवणारेच श्रीमंत होतात

जगप्रसिद्ध रिच डॅड पुअर डॅड या पुस्तकाचे लेखक आणि आर्थिक शिक्षणाचे समर्थक रॉबर्ट कियोसाकी यांनी पुन्हा एकदा संपत्तीबद्दलच्या पारंपरिक समजुतींना आव्हान दिले आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, श्रीमंत आणि गरीब यांच्यातील खरा फरक पैसा, नशिब किंवा शैक्षणिक पात्रता नसून भावनिक बुद्धिमत्ता (ईक्यू) आहे.

कियोसाकींच्या मते, भय हा लोकांना श्रीमंत होण्यापासून रोखणारा सर्वात मोठा अडथळा आहे. ज्यांना स्वतःच्या भावनांवर नियंत्रण ठेवता येत नाही, ते आयुष्यभर आर्थिकदृष्ठ्या मागेच राहतात.

कियोसाकी यांनी एक्स (पूर्वीचे ट्विटर) या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर लिहिलेल्या पोस्टमध्ये म्हटले आहे की, अनेक लोक आर्थिकदृष्ट्या अपयशी ठरतात ते ज्ञानाच्या अभावामुळे नव्हे, तर भावनांच्या प्रभावाखाली निर्णय घेतल्यामुळे. त्यांचे म्हणणे आहे की, ज्यांना हरण्याची भीती जिंकण्याच्या इच्छेपेक्षा जास्त असते, ते कधीच श्रीमंत होऊ शकत नाहीत. त्यांनी याबाबत एक उदाहरणही दिले आहे. काही वर्षांपूर्वी त्यांचा कॉईनबेस ॲपमध्ये असलेला बिटकॉइन पोर्टफोलिओ फारच छोटा होता, परंतु आज त्यात त्यांनी कोट्यवधी डॉलर्स कमावले आहेत. तरीसुद्धा, त्यांनी हा आकडा आपल्या एका मित्राला दाखवला, तेव्हा मित्राने त्या नफ्याकडे पाहण्याऐवजी गेल्या काही महिन्यांत झालेल्या थोड्याशा नुकसानीवरच लक्ष केंद्रित केले. कियोसाकींच्या मते, हीच मानसिकता श्रीमंत, मध्यमवर्गीय आणि गरीब यांच्यातील खरी रेषा आहे. एकाच आकड्याकडे बघताना एखाद्याला शक्यता दिसते, तर दुसऱ्याला धोका !



कियोसाकी स्पष्टपणे सांगतात की पैशाच्या व्यवहारात ईक्यू हा आयक्यूपेक्षा जास्त प्रभावी आहे, विशेषतः ज्यांच्याकडे उच्च आयक्यू असतो, तेही भावनिकदृष्ट्या कमजोर असतील, तर ते संपत्ती टिकवू शकत नाहीत. त्यांचे मत आहे की, गरीब आणि मध्यमवर्गीय लोक जिंकण्यापेक्षा हरण्याची भीती बाळगतात, त्यामुळे ते नेहमी सुरक्षिततेच्या कोंडीत अडकतात. हरण्याची भीतीच त्यांना मोठे विचार करू देत नाही. कियोसाकींच्या शब्दांत हलुझर्स हॅव लो ईक्यू. अपयशी ठरणाऱ्यांना स्वतःच्या भीती आणि लोभावर नियंत्रण ठेवता येत नाही.

कियोसाकी म्हणतात, भीती आणि लोभ हे दोन्ही भाव नैसर्गिक आहेत. पण यशस्वी लोक ते ओळखतात, समजून घेतात आणि त्यांच्यामुळे निर्णय बिघडू देत नाहीत. त्यांचे म्हणणे आहे की, ईक्यू आयक्यूपेक्षा अधिक सामर्थ्यवान आहे आणि म्हणूनच माझे 'पुअर डॅड' जे अत्यंत सुशिक्षित असूनही आर्थिकदृष्ट्या गरीब राहिले. त्यांनी पुढे लिहिले की, अनेक शिक्षक किंवा उच्चशिक्षित लोक आर्थिकदृष्ट्या संघर्ष करताना दिसतात. त्यांच्याकडे उच्च आयक्यू असते, पण ईक्यू कमी असतो.

### कियोसाकींचा सल्ला भावनांवर विजय मिळवा

त्यांनी आपल्या पोस्टचा शेवट एका साध्या पण खोल अर्थ असलेल्या वाक्याने केला: जर तुम्हाला श्रीमंत आणि आनंदी व्हायचे असेल, तर तुमचा ईक्यू उच्च ठेवा ह म्हणजेच, तुमच्या भय आणि लोभापेक्षा तुम्ही स्वतः अधिक शहाणे व्हा.

रॉबर्ट कियोसाकी हे केवळ लेखक नाहीत, तर ते रिच डॅड कंपनी या शिक्षण संस्थेचे संस्थापक आणि आर्थिक स्वावलंबनाचे जागतिक प्रचारक आहेत. त्यांच्या रिच डॅड पुअर डॅड या पुस्तकाने जगभरातील कोट्यवधी लोकांच्या आर्थिक विचारसरणीत आमूलाग्र बदल घडवून आणला. त्यांच्या कॅशफ्लो या बोर्ड गेमद्वारे ते लोकांना आर्थिक साक्षरता आणि गुंतवणुकीतील निर्णयक्षमता शिकवतात. त्यांच्या तत्त्वज्ञानाचा केंद्रबिंदू एकच पैशाबद्दल भीती बाळगू नका, त्याला समजून घ्या. ◆◆◆


शिवसेना विभागप्रमुख, अध्यक्ष-रामकृष्ण प्रतिष्ठान
श्री. रवी रामकृष्ण घरत
यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा
श्री. राजू महादेव घरत
(प्रो. वैष्णव ट्रेडर्स)
जन्मदिवस
एका दानशुराचा...
जन्मदिवस एका
दिलदार व्यक्तीमत्वाचा...
जन्मदिवस लाडक्या
भावाचे...
जीवेत शरद: शतम्
3 नोव्हेंबर


युवकांचे
प्रेरणास्थान
मा.श्री.
रविदादा
रामकृष्ण
घरत
०३ नोव्हेंबर
आपणांस जन्मदिनी दीर्घायुष्याच्या
अनंत शुभेच्छा !
कृतिशील विचारांचा
गतिशील माझा नेता
श्री. पंकज पाटील
शाखा प्रमुख
श्री. तुषार चव्हाण
शाखा प्रमुख
श्री. मोतीराम घोंधळे
शाखा प्रमुख


शिवसेना विभागप्रमुख
अध्यक्ष-रामकृष्ण प्रतिष्ठान
मा.श्री.
रवी घरत
3 नोव्हेंबर
आपणांस
वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा
श्री. राजेश पाटील
श्री. डी. सी. पाटील
श्री. संजय भोईर
श्री. साजन कासार
श्री. हरिष म्हात्रे
श्री. महेश करकेरा


शिवसेना
03 नोव्हेंबर
संकल्प असावेत नवे तुमचे, मिळाव्या त्यांना नव्या दिशा,
प्रत्येक स्वप्न पुर्ण व्हावे हाच वाढदिवसाच्या शुभेच्छा..!
शिवसेना विभागप्रमुख,
अध्यक्ष - रामकृष्ण प्रतिष्ठान
मा. श्री. रवि
रामकृष्ण
घरत
आपणांस या जन्मदिनी
दिर्घायुष्याच्या अनंत...
शुभेच्छा
सौ. नम्रता रवि घरत
मा. नगरसेविका ठा.म.पा.
मंगेश कदम
उप विभागप्रमुख
शिवाजी शिंदे
उप विभागप्रमुख
श्याम पाटील
उप विभागप्रमुख
सुनील मोरे
उप विभागप्रमुख
संजय पाटील
उप विभागप्रमुख
परेश पारेख
उप विभागप्रमुख
महेश करकेरा
विभाग समन्वयक
साजन कासार
मा. परिवहन सदस्य ठा.म.पा.
शहरसंघटक ओवळा माजिवडा विधानसभा क्षेत्र
मोतीराम गोंधळे
शाखाप्रमुख
पंकज पाटील
शाखाप्रमुख
संजय अंबूरे
शाखाप्रमुख
तुषार चव्हाण
शाखाप्रमुख
राजेश झा
शाखाप्रमुख
जयकिशन दुधाने
शाखाप्रमुख
दिलीप जोशी
शाखाप्रमुख
पद्माकर ताटे
शाखाप्रमुख
गिरीधर कांबळे
शाखाप्रमुख
यशोधर मुरकर
शाखाप्रमुख
सुभाष गुप्ता
शाखाप्रमुख
राजेंद्र ठाकरे
शाखाप्रमुख
अभिजीत जाधव
शाखाप्रमुख
दिलीप भट्टाचार्य
शाखाप्रमुख
शेखर सुळे
शाखाप्रमुख
विनानाथ सिंह
शाखाप्रमुख
राजेश जयस्वार
शाखाप्रमुख
कौशल डाकी
शाखाप्रमुख
सुमित भोसले
शाखाप्रमुख
विजय पवार
शाखाप्रमुख
रमेश पाटील
शाखाप्रमुख
प्रमोद जयस्वाल
शाखाप्रमुख
सुनील सावकार
शाखाप्रमुख
संजय सालसकर
शाखाप्रमुख
दिगंबर कांबळे
शाखाप्रमुख
श्रीकांत सोनकांबळे
शाखाप्रमुख
सचिन जोईजोडे
शाखाप्रमुख